26-07-2013 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A

SJB/ 11:00

26-07-2013 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A-1

SJB/ D/ KTG/ 11:00

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.मोहन जोशी)

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.00 वाजता 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली.)

नंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

तालिका सभापती : सभागृहाची बैठक एक तासासाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सकाळी 11 वाजून 15 मिनिटांनी एक तासाकरिता स्थगित झाली)

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

<u>नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत</u>

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, काल सिंचनाच्या संदर्भात नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने सभागृहात चर्चा सुरु होती. परंतु आपण याबाबत निर्णय दिल्यानंतर माननीय सभापती महोदय, आपल्याशी माननीय मुख्यमंत्री, या सभागृहाचे नेते व माननीय उप मुख्यमंत्री यांची चर्चा झाली आहे. आम्हाला वारंवार हेच म्हणावयाचे आहे की, उच्च न्यायालयात हा विषय आहे असे सांगितले जाते. परंतु काल आम्ही तेही दाखवून दिले आहे की, काही वेळा अशी चर्चा झालेली आहे. असे असले तरी माझ्याकडे नागपूरच्या अधिवेशनातील दिनांक 14.12.2012 रोजीचा नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव आहे. "आदिवासी विकास विभागाच्या अंतर्गत करण्यात आलेल्या खरेदीमध्ये 6 हजार रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याविषयी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल होणे, या जनहित याचिकेत सादर करण्यात आलेल्या पुराव्यानुसार माननीय उच्च न्यायालयाने प्रथम दर्शनी या खरेदीमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे मान्य करणे," असे त्या प्रस्तावात नमूद केलेले होते. माननीय उच्च न्यायालयात प्रोसिडिंग चालू असताना त्या प्रस्तावावर सभागृहात जवळपास साडेपाच तास चर्चा केली होती. अशी अनेक उदाहरणे आहेत. तरीही काल आम्हाला सिंचनावर चर्चा करावयाची असल्यामुळे न्यायालय व माननीय राज्यपालांचा विषय बाजूला ठेवून त्या प्रस्तावातील बाकीच्या विषयावर चर्चा करण्याची आम्ही आपल्याकडे परवानगी मागितली.

सभापती महोदय, न्यायप्रविष्ट असलेल्या बाबींसंबंधी सभागृहात अनेकदा कन्फ्यूजन निर्माण होते. घटनेमध्ये स्पष्ट तरतूद असली तरी निर्माण होते. त्यामुळे एकदा कधी तरी सर्वांच्या सोयीने रिडिफाईन करण्यासाठी आपण ॲडव्होकेट जनरल यांना बोलवून चर्चा करावी अशी सूचना मी, सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, रामदास कदम, व जयंत पाटील यांनी केली होती. त्यानंतर सभागृहातील वातावरण शांत झाले होते. आपण मला बोलण्याची परवानगी दिली. माझी

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ D/

श्री.विनोद तावडे....

3-4 वाक्ये पूर्ण झाली नाहीत तोवर माननीय मंत्री श्री.नारायण राणे उभे राहिले आणि त्यांनी नियमांचे पुस्तक घेऊन नियम क्र.34 (2) (1) चा संदर्भ वाचून दाखविला. त्या प्रस्तावाबाबत काही सन्माननीय सदस्यांनी शंका उपस्थित केल्यावर माननीय सभापतींच्या निवासस्थानी विधानपरिषदेचे सचिव, सचिवालयातील अधिकारी हे एकत्र बसले. या नियमामध्ये तो प्रस्ताव बसतो, हा नियम याला लागू होत नाही असे माननीय सभापतींनी त्या ठिकाणी सांगितले.

बुधवारी पुन्हा सभागृहात गोंधळ झाला. त्यानंतर माननीय सभापतींच्या दालनामध्ये विधिमंडळाचे प्रधान सचिव माननीय श्री.कळसे साहेब आले होते. त्या ठिकाणी आम्ही सर्वांनी चर्चा केली होती. त्यावेळी माननीय श्री.कळसे साहेबांनी असे सांगितले की, हा नियम याला लागू होत नाही. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी काल असे म्हटले होते की, नियम व कायदे करणारे अधिकारी आहेत. त्यांनी काही सांगितले व त्यांचे त्याबाबत काही नोटिंग आले तर ? त्यानंतर माननीय सभापतींनी निर्णय दिला होता. माननीय मंत्री श्री.नारायण राणे साहेबांचा काही तरी वेगळा नियम आहे. यानंतर सुध्दा माननीय सभापती साहेब आपण त्यावर निर्णय दिला की, त्या संदर्भानुसार ही चर्चा निकोप वातावरणात होणार नाही असे मला वाटते. तद्नंतर आपण तो प्रस्ताव थांबविला. वारंवार असे सांगितले जाते की, सभागृहात गोंधळ झाला, विरोधी पक्ष व सत्ताधारी पक्षाचे सदस्य भांडत बसले.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शीघ्रलिपी नोंदी

श्री. विनोद तावडे...

मी माननीय सभापती, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री, माननीय संसदीय कार्यमंत्री यांना सांगितले, आपण येथे बसलेल्या पत्रकारांना, अधिका-यांना, स्टाफला विचारा. किंवा या सभागृहाचे जे शुटींग चालते ते पहा. आमच्या विरोधी पक्षाकडून कोण, कधी उभे होते ? समोरुन आरडाओरडा होत होता त्यावेळी आमच्याकडून कोण उभे होते, आम्ही घोषणेला कोणती प्रती घोषणा दिली हे आपण कालच्या दिवसाचे प्रोसिडिंग्ज काढून पहावे. कोणी असे केले असेल तर आम्ही म्हणू की दोन्ही बाजूंनी केले. सत्ताधारी आणि विरोधक दोघांनी गोंधळ घातला असे जे वारंवार सांगितले जाते ते खरे नाही.

मला असे म्हणावयाचे आहे की, सत्ताधारी पक्षाने केलेल्या भ्रष्टाचाराबाबत विरोधी पक्षाला प्रस्ताव आणू द्यावयाचा नसेल तर त्याबाबतची प्रक्रिया कशी असते हे काल आम्ही पाहिले. म्हणून सभापती महोदय, आपण आम्हाला संरक्षण दिले पाहिजे. आपण आम्हाला संरक्षण देणे अपेक्षित होते. सभागृह शांत झाले, मंत्री महोदय श्री. नारायण राणे साहेब यांनी नवीन नियम वाचून दाखवला. त्या नियमावर दोन वेळा चर्चा होऊन निर्णय झाला. त्यावर चर्चा करायची नाही असा निर्णय झाला.म्हणून या बाबतीत विरोधी पक्षाला जे संरक्षण आपणाकडून मिळाले पाहिजे ते मिळत नाही. नागपूरच्या अधिवेशनातील प्रस्तावाचा मी या ठिकाणी उल्लेख केला. तो प्रस्ताव आपण स्वीकारला, त्यावर सहा तास चर्चा झाली. असे अजून अनेक प्रसंग आहेत. आपण आम्हाला आदेश द्या, की सरकारच्या भ्रष्टाचारावर, सिंचनाच्या भ्रष्टाचारावर विरोधी पक्षाने बोलायचे नाही, मग आम्ही मंत्री महोदय श्री. सुनील तटकरे यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव देतो. हे सभागृह तसे चालवायचे असेल तर तसेच चालवा. काल आपण शेवटी असे म्हणाला होता की, मी याबाबत माननीय सभापतींशी चर्चा करतो आणि हा जो प्रस्ताव आता थांबवलेला आहे त्याबाबत उद्या सांगतो.

उप सभापती : मी "उद्या" असे काही म्हटलेले नाही. मी चर्चा थांबवतो असे म्हटले. आपण आपले म्हणणे मांडावे.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण चर्चा करतो असे म्हटले, म्हणजे चर्चा झाल्यानंतर आपण आम्हाला सांगणार असे आम्ही विरोधी पक्षाने गृहीत धरले..

उप सभापती : आपण काहीही गृहीत धरुन मला गुंतवू नका.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : माझ्याकडे प्रोसिडिंग्ज आहे...

उप सभापती : माझ्याकडेही प्रोसिडिंग्ज आहे. मी काय बोललो ते मला माहीत आहे..

श्री. विनोद तावडे : त्यामध्ये "उद्या" शब्द नाही, हे मी मान्य करतो. मी माननीय सभापतींशी चर्चा करतो असे आपण सांगितले... आपण चर्चा केली. मग ही चर्चा तुमच्या पुरती ठेवणार की ज्या विषयाबाबत आणि ज्यांच्या बाबत चर्चा झाली त्यांना ती चर्चा सांगणार ? विरोधी पक्षाने सत्ताधारी पक्षामध्ये बसणा-या लोकांच्या भ्रष्टाचारावर बोलायचे की बोलायचे नाही, काय चर्चा केली ते आम्हाला सांगा. आम्ही त्याची वाट पहात आहोत. तो प्रस्ताव चर्चेला घ्या.

उप सभापती : मी काल जो निर्णय घेतला तो माझा निर्णय अंतिम आहे. त्या निर्णयामध्ये कोणताही बदल नाही. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी त्यांच्या आताच्या भाषणामध्ये माननीय सभापतींच्या निवासस्थानी काय चर्चा झाली ती त्यांनी या ठिकाणी उद्धृत केली. मग मला आता असे म्हणावयाचे आहे की, आपण मला आता या ठिकाणी जे सांगायला सांगता त्या बाबतीत सांगायचे झाले तर आताच्या चर्चेला आपण देखील तेथे उपस्थित होता. माझ्या आधी आपण तेथे जाऊन बसला होता. पण ह्या गोष्टी या सभागृहात घडलेल्या नाहीत. आपण माझ्या आधी तेथे जाऊन बसलात आणि मी तुमच्या नंतर आलो. पण हा काही या सभागृहाच्या चर्चेचा विषय नाही. नेमकी चर्चा काय झाली हे महत्वाचे आहे. हॉटेलमध्ये गेल्यानंतर कोण चहा प्याला कोण कॉफी प्याला हे महत्वाचे नसून बिल कोणी भरले हे महत्वाचे. आपण भलत्या गोष्टींवर का बोलता ?..(अडथळा).. आपणास प्रस्ताव मांडायला परवानगी दिली होती. काही कायदेशीर बाबींच्या अधीन राहून ही चर्चा करावी अशा प्रकारची परवानगी दिली होती. परंतु ही चर्चा निकोप वातावरणात नीट होत नव्हती. जवळपास दोन दिवस भरपूर चर्चा झाली. ही चर्चा निकोप वातावरणात होत नव्हती म्हणून ती मी स्थगित केली ही वस्तुस्थिती आहे. त्यानंतर कालच्या भाषणामध्ये सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांच्या भाषणानंतर सन्माननीय सदस श्री. रामदास कदम यांनी या ठिकाणी सांगितले की, या वातावरणात चर्चा होणे बरोबर नाही, आपण ॲडव्होकेट जनरल यांच्याशी बोलावे व त्यानंतर सोमवारी ही चर्चा घ्यावी. सोमवारला अजून वेळ आहे. मी सर्वच चर्चा सांगतो. मी गु-हाळ लावणार नाही.माननीय सभापतींच्या येथे जी चर्चा झाली त्यावेळी ते म्हणाले की,मी विधी व न्याय विभागाच्या

उप सभापती....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि इतर विभागाच्या सचिवांशी बोलतो त्यानंतर बाकीची चर्चा ॲडव्होकेट जनरल यांच्याशी करायची की नाही हे मी ठरवेन आणि तुम्हाला सांगेन. मी माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांना सांगू इच्छितो की, आपण सभागृहामध्ये बोलत असताना जे काही घडले असेल ते स्पष्टपणे सांगावे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती...

एक मुद्दा अर्धा सांगावयाचा आणि दुसरा मुद्दा अर्धा सांगावावयाचा व कन्फ्यूजन तयार करावयाचे हे तितकेसे योग्य नाही. आता देखील आपण सभागृहात सांगितले की, मी असे म्हणालो की, मी सभापतींशी चर्चा करुन आपल्याला उद्या सांगेन. मी असे बोललोच नव्हतो. "उद्या" या एका शब्दाने किती मोठा फरक पडू शकतो हेही तितकेच खरे आहे. आपण माझ्यापेक्षाही प्रगल्भ आहात, विरोधी पक्ष नेते आहात, या सदनाचे जबाबदार नेते आहात. मला असे वाटते की, आता या सभागृहाचे कामकाज सुरळीत सुरु व्हावे म्हणून आपण व आपले सर्व सहयोगी मला सहकार्य कराल. आता मी सभागृहापुढील कामकाज सुरु करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण मला...

उप सभापती : मी आपल्याला काहीही वाईट बोललेलो नाही किंवा आपला गैरसमज होईल असे बोललेलो नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण माझे नाव घेऊन बोलला आहात.

उप सभापती : तुमचे नाव श्री.तावडे आहे, म्हणून मी तुमचे नाव घेतले आहे. पाहिजे तर आपल्याला विरोध पक्ष नेते असे म्हणतो.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, आपण असे म्हणालात की, आपण फक्त सोयीचे सांगता, जे सोयीचे नाही ते सांगत नाही. मी सोयीचे काय सांगितले आहे ते सांगा? कोण सोयीचे बोलतात आणि कोण सोयीचे बोलत नाही या बाबतची माहिती मी देखील सांगतो. एक मुद्दा अर्धा सांगावयाचा आणि दुसरा मुद्दा अर्धा सांगावावयाचा आणि कन्फ्यूजन तयार करावयाचे. मी काय कन्फ्यूजन केले ? आपण अशा प्रकारचा माझ्यावर आरोप केला आहे.

उप सभापती : मी आपल्यावर कोणत्याही प्रकारचा आरोप केलेला नाही. कोणावर आरोप करणे मला आवडत नाही. आपण माझ्या बोलण्यास आरोप समजत असाल तर मी फार दिलगिरी व्यक्त करतो. परंतु मी आपल्यावर आरोप केलेला नाही. मी या ठिकाणी सत्यकथन सांगितले. मी पुन्हा सांगतो की, मी आपल्यावर आरोप केलेला नाही.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, काल नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावावर माननीय विरोधी पक्ष नेता यांनी चर्चा सुरु केली असताना सभागृहातील काही सन्माननीय सदस्यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम 34(2) चा उल्लेख करुन देशातील कोणत्याही न्यायालयात एखादी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नारायण राणे...

बाब न्यायप्रविष्ठ असेल तर त्यावर चर्चा करण्यात येऊ नये आणि ही चर्चा थांबवावी अशी विनंती केली. या बाबतीत आपण निर्णय दिला त्यानंतर सभागृहाचे काम स्थगित करण्यात आले. मला असे म्हणावयाचे आहे की, माननीय सभापती महोदयांनी निर्णय दिल्यानंतर त्यावर चर्चा करता येते काय ? मी या ठिकाणी मुद्दाम "कौल आणि शकधर" ची सहावी आवृत्ती आणलेली आहे. मी उल्लेख करतो की, आपण दिलेल्या निर्णयानंतर सभागृहात बरीच चर्चा होत होती. ती चर्चा मला योग्य वाटली नाही. महाराष्ट्राला संसदीय परंपरा लाभलेली आहे. त्यानुसार सभागृहात काही प्रथा आणि संकेत पाळावे लागतात. सभागृहात प्रथा आणि परंपरा पाळली जावी या मताचा मी आहे.

महोदय, "कौल आणि शकधर"च्या सहाव्या आवृत्तीतील पृष्ठ क्रमांक 126, परिच्छेद क्रमांक 3 चा उल्ले्ख या ठिकाणी वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटले आहे की, "The Speaker's rulings, as already stated, cannot be questioned except on a substantive motion. A member who protests against the ruling of the Speaker commits contempt of the House and the Speaker." या परिच्छेद क्रमांक 3 मध्ये स्पष्टपणे उल्लेख देण्यात आलेला आहे आणि असे असताना माननीय सभापतींनी निर्णय दिल्यानंतरही या सभागृहात चर्चा करण्यात येत आहे, माननीय सभापतींच्या निर्णया नंतर चर्चा करणे हा हक्कभंग आहे ही गोष्ट मी आपल्या मार्फत सभागृहाला सांगू इच्छितो. माननीय विरोधी पक्ष नेत्यांना मी विनंती करतो की, आपण अशा प्रकारचा प्रस्ताव आणू शकता. तुम्ही आणलेल्या प्रस्तावास माझा मुळीच विरोध नाही. परंतु त्यातील आक्षेपाई बाबी आहेत, कोर्टाशी संबंधित आहेत तेवढया बाबी टाळून चर्चा केली असती तर हा प्रश्न उपस्थित झाला नसता. परंतु नियम 260 अन्वये जो प्रस्ताव दिलेल्या आहे, त्यात काही आक्षेपार्ह बाबी आहेत, त्या असू नयेत असा मुद्दा आहे.

माननीय सभापतींनी निर्णय दिल्यानंतर नियम 34 (2) प्रमाणे त्यावर चर्चा करता येत नाही असे स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे. सभापती महोदयांनी निर्णय दिल्यानंतर जी चर्चा होते ती चर्चा सभागृहाच्या प्रथेला, परंपरेला शोभणारी नाही ही बाब मी पुन्हा आपल्या माध्यमातून सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो.

यानंतर श्री. भोगले...

अशोधित प्रत / शोधित्रीपाठी नाही

उप सभापती : माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो उल्लेख केला त्या संदर्भात मी कालचे मिनिट्स वाचून दाखवितो. मी असे म्हटले होते की, "काल सन्माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांनी विधानपरिषद नियमातील नियम 34 मधील कलम 2(1) चा संदर्भ दिला आणि तो अत्यंत योग्य आहे. त्या संदर्भानुसार ही चर्चा निकोप वातावरणात होणार नाही असे मला वाटते म्हणून मी नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चा थांबवित आहे." त्यानंतर माननीय विरोधी पक्षनेते असे म्हणाले की, "महोदय या प्रस्तावावरील चर्चा थांबविल्यानंतर या चर्चेचे पुढे काय होणार आहे?" या प्रश्नाला उत्तर देताना मी असे म्हटले की, "या बाबतीत मी माननीय सभापतींशी चर्चा करतो".....(अडथळा).....हे मी रुलिंग झाल्यानंतर म्हटलेले आहे. त्यानंतर अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलावयास उभे राहिल्यानंतर मी म्हटले, "या ठिकाणी उपस्थित करण्यात आलेल्या संदर्भाच्या अनुषंगाने मी माझा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे मी दिलेल्या निर्णयावर आता चर्चा करता कामा नये. मी पुन्हा एकदा निदर्शनास आणून देतो की, मी या प्रस्तावावरील चर्चा थांबविलेली आहे."

श्री.विनोद तावडे : माननीय मंत्री श्री.नारायण राणे यानी कौल आणि शकधर पुस्तकातील जो संदर्भ वाचून दाखविला त्या संदर्भात नंतर डिबेट करु. सभागृहात माननीय मंत्री श्री.नारायण राणे येण्यापूर्वी मी दोन मुद्दे उपस्थित केले होते. नागपूरच्या 2012 च्या हिवाळी अधिवेशनात आदिवासी विकास विभागातील भ्रष्टाचाराच्या चर्चेचा मुद्दा उपस्थित केला होता. त्या प्रस्तावामध्ये प्रत्येक बाबीचा उल्लेख आहे. उच्च न्यायालयात प्रकरण समाविष्ट असल्याचा उल्लेख केलेला आहे. तो प्रस्ताव स्वीकारला गेला आणि त्या प्रस्तावावर सभागृहात सुमारे 6 तास चर्चा झालेली आहे. माहिती म्हणून मी हे सांगत आहे. हा मुद्दा मांडला त्यावेळी ॲडव्होकेट नारायण राणे सभागृहात उपस्थित नव्हते.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी कोणत्या भाषेत सभागृहात बोलावे याबद्दल आपण त्यांना समज द्यावी. एखाद्या माननीय सदस्याने मुद्दा मांडला किंवा सभागृहाच्या निदर्शनास आणून दिला याचा अर्थ ॲडव्होकेट असणे किंवा तरफदारी केली असा होत नाही. या सभागृहाचे कामकाज नियमाने, प्रथा आणि परंपरेनुसार चालावे. चुकीचा उल्लेख होत असेल,चुकीचे काम होत असेल तर ते नजरेस आणण्याकरिता वकीलच पाहिजे असे नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : ॲडव्होकेट हा शब्द चांगला आहे. आपण माननीय सभापतींशी चर्चा करतो असे सांगितले होते. ती चर्चा काय झाली हे सुध्दा सभागृहात आम्ही विचारायचे नाही का?.....(अडथळा)....त्याकरिता शकधर आणि कौल पुस्तकाचा आधार घ्यायचा का? माननीय मंत्री श्री.नारायण राणे यांनी विधानसभेचे विरोधी पक्षनेतेपद भूषविलेले आहे. विरोधी पक्षाचे अधिकार काय आहेत हे त्यांना चांगले अवगत आहे. माननीय उप सभापतींनी निर्णय देताना मी माननीय सभापतींशी चर्चा करतो असे म्हटले होते. त्याबाबत आम्ही विचारणा करावयाची नाही का?

उप सभापती : मी महसूल मंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी आपले निवेदन करावे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे अनेक सन्माननीय एकाच वेळी बोलण्यासाठी उभे असतात)

पृ.शी.: राज्यात दोन तालुक्यांसाठी एक महसुली उप विभाग निर्माण करणे

मु.शी.: राज्यात दोन तालुक्यांसाठी एक महसुली उप विभाग निर्माण करणे यासंबंधी माननीय महसूल मंत्र्यांचे निवेदन

श्री.बाळासाहेब थोरात (महसूल मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

महसुली विभागाच्या पुनर्रचनेकरिता नेमण्यात आलेल्या बोंगीरवार अभ्यास गटाने कार्यरत असलेल्या विशेष भूसंपादन अधिकाऱ्यांना उप विभागीय अधिकाऱ्यांचा कार्यभार सोपवून त्यांच्याकडून सर्व प्रकारची महसुली कामांसह भूसंपादनाची कामे करुन घेण्याबाबत शिफारस केली होती. त्यावर सारासार विचार करुन शासनाने दोन तालुक्यांसाठी एक उप विभाग निर्माण करुन त्यांच्या उप विभागीय अधिकाऱ्यांकडे महसुली व भूसंपादन विषयक कामे सोपविण्याचा निर्णय मंत्रीमंडळाने दिनांक 23 मे, 2012 रोजी घेतला आहे.

या निर्णयानुसार अस्तित्वात असलेल्या 115 उप विभागाची पुनर्रचना करुन 67 नवीन उप विभाग नव्याने निर्माण करुन राज्यात एकूण 182 उप विभाग दिनांक 15 ऑगस्ट, 2013 पासून कार्यान्वित करण्याची अधिसूचना आज दिनांक 26 जुलै, 2013 रोजी शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे.

(गोंधळ)

(विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी बहिर्गमन केले)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: लेखी उत्तरे

मु.शी.: तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवणे

अतिरिक्त सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने शुक्रवार, दिनांक 19 जुलै, 2013 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : दिनांक 19 जुलै, 2013 रोजीची तारांकित प्रश्नोत्तराची यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी)

....5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

उप सभापती : सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी "खामगाव (जि.बुलढाणा) येथे बीपीएल व अंत्योदय कार्डधारकांना जानेवारी ते मार्च, 2013 या तीन महिन्यांसाठी दिलेला अतिरिक्त धान्य साठा जुलै, 2013 च्या तिसऱ्या आठवड्यात काळ्या बाजारात गेल्याची घटना उघडकीस येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार यांनी "राज्यातील हजारो शिक्षक 100 टक्के अनुदानित संस्थांमध्ये कार्यरत असूनही त्यांना मान्यता व वेतन न मिळणे आणि आरक्षण बिंदूनुसार नियुक्त झालेल्या मागासवर्गीयांना शासनाने जाणीवपूर्वक आर्थिक लाभापासून वंचित ठेवणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, भगवान साळुंखे, रामनाथ मोते, डॉ.रणजित पाटील यांनी "युवत क्रांतीदलामार्फत दिनांक 15 जुलै, 2013 पासून पुणे येथे प्राथमिक शिक्षण सेवक भरतीसाठी सुरु केलेला बेमुदत सत्याग्रह" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी "मौजे आरडगाव (ता.राहुरी, जि.अहमदनगर) येथे ग्रामस्थांनी वाळूची बेकायदेशीर वाहतूक होत असलेले तीन वाळू ट्रक दिनांक 23 जुलै, 2013 रोजी पकडणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी "सिल्लोड (जि.औरंगाबाद) येथे रोजगार हमी योजनेत दोन वर्ष काम केल्यानंतरही कामाचे पैसे न मिळाल्यामुळे कर्जबाजारी झाल्याने बुलढाणा जिल्हयातील सहा शेतमजुरांनी केलेली आत्महत्या" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना

...6..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उप सभापती.....

दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "सम्राट अशोक प्राथमिक शाळा परभणी येथील सहाय्यक शिक्षिका सौ.बाली शिंदे यांनी आपल्या पतीसह परभणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दिनांक 24 जुलै, 2013 रोजी अंगावर रॉकेल ओतून आत्मदहनाचा केलेला प्रयत्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी "एव्हरस्वीट अपार्टमेंट, जे.पी.रोड, सात बंगला, अंधेरी (पश्चिम) येथील वसाहतींमध्ये मेट्रो स्टेशनच्या कामानिमित्त एमएमआरडीए कडून होत असलेला अन्याय" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार, सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, भाई गिरकर यांनी "सार्वजनिक आरोग्य विभागाच्या प्रयोगशाळेच्या अहवालानुसार राज्यातील पाणी हे पिण्याजोगे नसल्याचा निष्कर्ष दिल्यामुळे आरोग्याचा मोठ्या प्रमाणात निर्माण झालेला प्रश्न" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "मुंबईतील मनोरा आमदार निवास, सह्याद्री अतिथीगृहात स्थापत्य, विद्युत, लिफ्ट अशा विविध विभागातील 508 कर्मचाऱ्यांना नियमित करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी "राज्यातील डान्सबार बंदी सर्वोच्च न्यायालयाने उठविण्यात येऊन आठ ते दहा दिवसाचा कालावधी उलटूनही फेरयाचिकेच्या संदर्भात कोणतीही कार्यवाही न होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा

उप सभापती.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री भाई गिरकर, विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, श्री.चंद्रकांत पाटील यांनी "सन 2011-12 मध्ये गणेशोत्सव मंडळाने बेस्टकडे तसेच मुंबई महानगरपालिकेकडे भरलेली अनामत रक्कम संबंधित गणेशोत्सव मंडळांना परत करण्याची आवश्यकता" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री चंद्रकांत पाटील, भाई गिरकर यांनी "वडाळ्यातून भक्तीपार्क मार्गे इस्टर्न फ्रीवेकडे जाणारा रस्ता भक्तीपार्क कॉम्प्लेक्सचे विकासक आणिक डेव्हलपमेंट कार्पोरेशनने येथून होणारी वाहतूक अनधिकृत असल्याचे सांगून या रस्त्यावरील प्रवेशद्वार बंद करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

नंतर जी.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विद्यापीठ सुधारणा विधेयक

L.C. BILL NO. V OF 2013

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994)

उप सभापती : विधानसभेकडून एक संदेश आला आहे. अतिरिक्त सचिव तो वाचून दाखवतील.

अतिरिक्त सचिव : महाराष्ट्र विधानसभेने दिनांक 15 जुलै, 2013 रोजीच्या बैठकीत संमत केलेला खालील प्रस्ताव विधानपरिषदेच्या माहितीसाठी पाठविला आहे :-

"सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक ५ महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) विधेयक,२०१३ दिनांक १५ जुलै, २०१३ रोजी. म.वि.स. नियम १५४ अन्वये महाराष्ट्र विधानसभेत मागे घेण्यात आले आहे.

उप सभापती : आता विधेयके घेण्यात येतील. विधेयकानंतर लक्षवेधी सूचना घेण्यात येतील.

..२..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विद्यापीठ(दुसरी सुधारणा) विधेयक.

L. C. BILL NO. VIII OF 2013 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT,1994) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

(विधेयक विचारात घेण्यासंबधीचा प्रश्न व विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव पुन: प्रस्तुत करण्यात आला.)

उप सभापती : आता मी विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबतचा प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून असंमत झाला

उप सभापती : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे.आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3, विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 8 संमत करण्यात यावे असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती :सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 8 संमत झाले आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: कृषी विद्यापीठ (सुधारणा) विधेयक.

L. A. BILL NO.XX OF 2013

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL UNIVERSITIES (KRISHI VIDYAPEETHS) ACT, 1983.)

श्री.राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 20 - महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, 1983 या मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 20 - महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, 1983 या मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 4 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 20 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 20 संमत झाले आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: विद्यापीठ (सुधारणा) विधेयक.

L. A. BILL NO. XXI OF 2013

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT, 1994.)

श्री.डी.पी.सावंत (उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 21- महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 21- महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.डी.पी.सावंत : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 21 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2013 चे वि.प.वि.क्रमांक 21 संमत झाले आहे.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.अजित....

पृ.शी.: औद्योगिक विकास (सुधारणा) विधेयक

L.A. BILL NO.IX OF 2013 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT ACT, 1961.) AND MOTION FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

श्री.सचिन अहिर (उद्योग राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 9 - महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, 1961 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

उप सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि क्रमांक-9 महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, 1961 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे,असा प्रस्ताव मांडतो.

उप सभापती : विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्यासंबंधीचा सन्माननीय सदस्य ॲड.आशिष शेलार यांचा प्रस्ताव आहे. तो त्यांनी मांडावा.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

उप सभापती : मी आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

<u>सन 1962 चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक 3 यामध्ये कलम 43-1ब नव्याने समाविष्ट करणे</u>

उप सभापती : खंड 2 ला सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांनी ती मांडावी.

(सन्माननीय सदस्य अनुपस्थित)

खंड 2 विधेयकाचा भाग झाला..

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि. क्रमांक -9 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 9 संमत झाले आहे.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: पशुधन सुधारणा (सुधारणा) विधेयक

L.C.BILL NO.VII OF 2013 (A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LIVE-STOCK IMPROVEMENT ACT.) AND MOTIONS FOR REFERRING THE BILL TO THE JOINT COMMITTEE

श्री.राजेंद्र मुळक (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.स.वि.क्रमांक 7- महाराष्ट्र पशुधन सुधारणा अधिनियम यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

उप सभापती : हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम, श्रीमती शोभा फडणवीस व डॉ.नीलम गोऱ्हे यांनी वेगवेगळे प्रस्ताव दिलेले आहेत, परंतु सन्माननीय सदस्य सभागृहात उपस्थित नसल्यामुळे मी आता विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 विधेयकाचा भाग झाला.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 चे वि.प.क्रमांक 7 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

उप सभापती : सन 2013 चे वि.प.वि.कमांक 7 संमत झाले आहे.

..4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईतील चांदिवली संघर्ष नगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या वसाहतील रहिवाशांची सुमेर बिल्डरने निवारा हक्क सुरक्षा समितीशी संगनमत करुन रहिवाशांची केलेली फसवणूक

मु. शी. : मुंबईतील चांदिवली संघर्ष नगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या वसाहतील रहिवाशांची सुमेर बिल्डरने निवारा हक्क सुरक्षा समितीशी संगनमत करुन रहिवाशांची केलेली फसवणूक या संबंधी श्रीमती विद्या चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छिते आणि त्या बाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"मुंबईतील चांदिवली संघर्ष नगर येथील झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या वसाहतीतील रहिवाशांना पुनर्विकासाच्यावेळी सुमेर बिल्डर या विकासकाने दाखविलेल्या विकास आराखड्यानुसार तेथे विकास केलेला नसणे, आराखड्यानुसार तेथे शाळा, बालवाडी, दवाखाना, समाजमंदिर, मैदान बगीचे रस्ते व त्यावरील दिवे असे योजनेत समाविष्ट असणे, परंतु निवारा हक्क सुरक्षा समितीशी (एनजीओ) बिल्डरने संगनमत करून यापैकी कोणत्याच सुविधा तेथील रहिवाशांना न देणे, मुख्य टाकीतून क्लस्टरच्या टाकीपर्यंत पाणी पुरविण्याची जबाबदारी पालिकेची असूनही तेथील रहिवाशांकडून क्लस्टर व विंगच्या टाकीच्या पाण्याचे बिल वसूल केले जाणे, निवारा हक्क सुरक्षा समितीकडून तेथील प्रत्येक सदनिकेकडून प्रत्येकी 77 रूपये पुनर्विकासाच्या वेळी घेतले जाणे, पुन्हा या समितीकडून घरे देतो असे आमिष दाखवून प्रति सदनिका रूपये 300 घेणे, अशाप्रकारे समितीने बिल्डरशी संगनमत करून येथील रहिवाशांची चालविलेली लूट थांबवून या समितीची चौकशी करावी व तेथे मुलभूत सुविधा उपलब्ध कराव्यात अशी येथील रहिवाशांची होत असलेली मागणी, या बाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा विषय आहे. सन 2004 पासून मुंबईतील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातील रहिवाशांचे पुनर्वसन कांदिवली येथे करण्यात येत आहे. हे पुनर्वसन शासनामार्फत करण्यात येत आहे की, निवारा हक्क या एनजीओ कडून केले जात आहे ? सुमेर बिल्डकडून त्यांचे पुनर्वसन केले जात आहे. त्यांनी प्रथम एसआरए प्रकल्पग्रस्तांना घरे देणे बंधनकारक आहे. या बिल्डरला प्रकल्प पूर्ण होण्यापूर्वीच 100 कोटी रुपयांचा टीडीआर विकण्याची परवानगी कशी देण्यात आली ?

यानंतर श्री.बोर्डे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

वास्तविक पाहता महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी टीडीआरची परवानगी दिली आहे. प्रकल्पामध्ये शेवटच्या माणसाला घर मिळेपर्यंत टीडीआर विकू नये असे बंधन घातलेले आहे.

मी स्पेसिफिक विचारते की, या सर्व बाबींची सी.आय.डी.मार्फत चौकशी करणार काय ? श्रीमती शबाना आझमी यांची निवारा हक्क सुरक्षा समिती आहे. आर्कीटेक्ट पी.के.दास, श्रीमती शबाना आझमी आणि गुरबीर सिंग या तिघांनी जो प्लान केला होता त्या नुसार प्रकल्प झाला आहे. त्या आराखड्यात शाळा, बालवाडी, दवाखाना, समाजमंदिर ही कामे नमूद केली होती. प्रकल्पबाधितांना जवळजवळ 34 हेक्टर क्षेत्रामध्ये 18,372 घरे देण्याचे सांगितले होते. 1.6 हेक्टर जमिनीवर दोन खेळाची मैदाने, 60 कम्युनिटी स्पेस सेंटर, 14 शाळा, आरोग्य केंद्र, 2 मोठे हॉस्पीटल, 2 मोठे हॉल, सांस्कृतिक कार्यक्रम भवन व दोन धार्मिक स्थळे तसेच प्रत्येक क्लस्टरमध्ये 550 घरांसाठी 14 कॉमन बालवाड्या आणि सोसायटीचे ऑफिस तसेच महिलांसाठी वेगळे केंद्र करण्याचे सांगितले होते. परंतु प्रत्यक्षात आज त्या ठिकाणी काहीही काम केलेले नाही.

महोदय, त्या झोपडपट्टीवासीयांची क्रूर चेष्टा करण्यात आली आहे. त्या ठिकाणी सबंध परिसरासाठी पाण्याची एकच टाकी देण्यात आली आहे. 12 हजार कुटुंबांचे त्या ठिकाणी पुनर्वसन झाले आहे. एका कुटुंबात सरासरी 5 व्यक्ती गृहीत धरल्यास 12 हजार कुटुंबांतील 60 हजार लोक त्या टाऊनशीपमध्ये राहत आहेत. या 60 हजार लोकांना 4-5 बिल्डींग मिळून एक टाकी देण्यात आली आहे. सुरुवातीला मोठ्या टाकीमध्ये पाणी टाकायचे, ते पाणी नंतर दुसऱ्या टाकीत टाकायचे आणि त्या नंतर इमारतीच्या गच्चीवरील टाकीमध्ये ते पाणी चढवावे लागते. त्या भागातील लोकांना इलेक्ट्रीसिटीचा खर्च परवडत नाही. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये नमूद केले आहे की, झोपडपट्टीवासीय असो किंवा कोणतीही संस्था असो, त्यांनी स्वत:चा खर्च स्वत: करावयाचा आहे. मुळात सुमेर बिल्डरने या बाबतची जबाबदारी घ्यायला पाहिजे होती. परंतु त्यांनी ती जबाबदारी घेतली नाही. त्या ठिकाणी निवारा हक्क समितीने शाळा बांधलेल्या नाहीत. त्यांनी सर्व जबाबदारी स्वत:कडे ठेवली आहे. माझ्या माहितीनुसार त्यांनी पुनर्वसनाच्या कामात ढवळाढवळ करु नये म्हणून त्यांना माननीय न्यायालयाने बाहेर काढले आहे. तरी सुध्दा समितीच्या माध्यमातून तेथील रहिवाशांकडून 600 रुपयांची पावती फाडून पैसे घेतले जात आहेत. त्यातून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण....

जवळजवळ 14 कोटी रुपये जमा करण्यात आलेले आहेत. ज्यांचे पुनर्वसन झाले नाही त्यांच्याकडून निवारा हक्क समिती 300 रुपयांचा फॉर्म जबरदस्तीने भरुन घेत आहेत. निवारा हक्क संस्थेने 1984 साली कुलाब्याच्या झोपडपट्टीवासीयांना दिंडोशीला पाठविले. त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी निवारा हक्क समितीला 6 एकर जागा मिळाली होती. परंतु.....

उप सभापती : मी सन्माननीय सदस्या श्रीमती विद्याताई चव्हाण यांना सांगू इच्छितो की, मी आपल्याला प्रत्येक लक्षवेधी सूचनेवरील चर्चेच्या वेळी विनंती करतो की, आपण नेमका प्रश्न विचारावा. आपण, आपला प्रश्न आणि माननीय मंत्र्यांचे उत्तर एकत्र देता की काय, असे वाटते.

श्रीमती विद्या चव्हाण : महोदय, मी स्पेसिफिक विचारते की, 2004 पासून जे पुनर्वसन केले जात आहे ते शासन करीत आहे की निवारा हक्क समिती ही एनजीओ करीत आहे ?

श्री.सचिन अहिर : महोदय, सदरहू प्रकल्प हा संयुक्त प्रकल्प आहे. अशा प्रकल्पांमध्ये खाजगी जमीन मालक पुढे येत असेल तर शासनाकडून त्यांना टीडीआर रुपाने किंबहुना त्याने पीएपीला जेवढी घरे उपलब्ध करुन दिली तेवढा इक्विलंट टीडीआर उपलब्ध करुन देता येतो. टीडीआर जेवढा जनरेट होतो त्याच्या प्रपोर्शनेटनुसार जेवढ्या पीएपीला घरे दिलेली असतील तेवढा टीडीआर रिलीज करण्याचा प्रयत्न करतो. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, त्यांना टीडीआर जास्त दिला आणि पीएपींना त्यांनी तेवढी घरे दिली नसतील तर त्या बाबत निश्चितपणे चौकशी केली जाईल.

नंतर श्री.बरवड.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर .....

वेल्फेअर सेंटर आणि आरजी बद्दल माझ्याकडे जी माहिती आहे त्यानुसार 2 शाळा आणि 2 वेल्फेअर सेंटर द्यावयाचे आहेत. त्यापैकी एक शाळा पूर्ण झालेली आहे. एका शाळेचे बांधकाम चालू आहे. एक वेल्फेअर सेंटर पूर्ण होऊन फेडरेशनच्या ताब्यात दिलेले आहे. रस्त्याचे आणि ड्रेनेजचे काम देखील पूर्ण झाले आहे. ज्यावेळी आपण लोकांचे पुनर्वसन करतो त्यावेळी अशी अपेक्षा असते की, त्यांनी सोसायटी करुन पुढचा मेन्टेनन्स सोसायटीने करावयास पाहिजे या बाबतीत कोर्टामध्ये युक्तिवाद झाला होता आणि कोर्टाने सुध्दा निर्णय देताना ही भूमिका घेतली होती की, पुढची जी काही जबाबदारी आहे ती फेडरेशनची राहील. फेडरेशनने ते मान्य केलेले आहे. त्यामुळे पाण्याच्या बाबतीत पुढची जबाबदारी फेडरेशनची राहणार आहे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी पाण्याच्या बाबतीत सांगितले पण त्या ठिकाणी आजही लोकांना पाणी मिळत नाही. त्या ठिकाणी लोकांकडून पैसे घेतले जात आहेत. निवारा हक्क समिती कोणत्या अधिकारात पैसे घेत आहे, निवारा हक्क समितीचा या प्रकल्पाशी काय संबंध आहे, हे पुनर्वसन शासनाने केले आहे की निवारा हक्क समितीने केले आहे ? तेथील पाण्याचा प्रश्न शासन सोडविणार आहे का ? महानगरपालिका त्या ठिकाणी पोहोचत नाही. महानगरपालिकेच्या कोणत्याही सोयी-सुविधा त्या लोकांना मिळत नाहीत.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, तातडीने महानगरपालिकेच्या यामध्ये लक्ष घालून हा प्रश्न सोडवावा अशा सूचना आयुक्तांना दिल्या जातील.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अनेक वेळा अनेक प्रश्नांच्या बाबतीत लक्ष घातलेले आहे. दुर्दैव असे आहे की, ही योजना ज्या भावनेतून तयार झाली त्यानुसार या योजनेचा खऱ्या अर्थाने उपयोग सर्वसामान्य गरिबांना व्हावयास पाहिजे तो काही अंशी होतो हे मी मान्य करतो परंतु त्यांच्या ज्या मूलभूत गरजा आहेत त्या महानगरपालिकेने पुरविणे आवश्यकच नव्हे तर ते अनिवार्य आहे. त्यांना ते करावेच लागते. यामध्ये माझे महत्वाचे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. त्यांच्या पाणी, सिवरेज व इतर ज्या मूलभूत गरजा आहेत त्या बाबतीत महानगरपालिका काय कार्यवाही करणार आहे ? त्याचा भूर्दंड त्यांच्यावर का बसविण्यात येत आहे ? टीडीआरच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप ....

बाबतीत निवेदनात असे म्हटले आहे की, जेवढे पीएपी त्यांनी आपल्याला दिले तेवढाच टीडीआर रिलीज करण्यात आला आहे. पण अशी परिस्थिती नाही. त्यांना पूर्ण टीडीआर रिलीज करण्यात आला आहे अशी माझी माहिती आहे. या बाबतीत वस्तुस्थिती काय आहे ? आपला कायदा स्पष्ट आहे, कायद्याची चौकट स्पष्ट आहे. जेवढे पीएपी मिळतील तेवढाच टीडीआर आपण रिलीज करावयास पाहिजे. पीएपी म्हणजे चार भिंती नव्हेत. जोपर्यंत उपभोक्त्याला पूर्ण घर मिळत नाही तोपर्यंत आपल्याला ते रिलीज करता येत नाही. त्या बाबतीत शासनाची काय भूमिका आहे ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी पहिल्या प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केले की, ज्या मूलभूत सुविधा महानगरपालिकेकडून द्यावयाच्या आहेत त्या त्यांना टाळता येणार नाहीत व त्याबाबत आयुक्तांना सूचना दिल्या जातील. त्या सुविधा त्यांना देण्यास भाग पाडण्यात येईल. टीडीआर बाबत सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे जर प्रोरेटा प्रमाणे आगाऊ टीडीआर द्यावयास पाहिजे होता पण जर अगोदरच संपूर्ण टीडीआर दिला असेल तर त्याची चौकशी केली जाईल.

श्री. भाई जगताप : चौकशी करुन काय कारवाई करणार ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, चौकशी केल्यानंतर त्यामध्ये दोषी आढळून आले तर कारवाई करण्यात येईल.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, सरकारने ज्यावेळी सुमेर बिल्डरला बांधकामाची परवानगी दिली त्यामध्ये अशी अट घातली होती की, पाण्याची व्यवस्था सुमेर बिल्डरने करावयास पाहिजे. ज्यावेळी बिल्डरला टीडीआर दिला जातो त्याचा अर्थ स्पष्ट असतो की, त्या टीडीआरच्या रुपाने आलेली जी काही रक्कम असेल त्यातील काही अंशी रक्कम या लोकांवर खर्च केली पाहिजे. त्याप्रमाणे बिल्डरने रक्कम खर्च केली आहे का ? जर केली नसेल तर सरकार म्हणून आपली काय जबाबदारी आहे, त्या रहिवाशांना पाणी मिळणार आहे का ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मी अगोदरच सांगितले की, संपूर्ण टाकीची व्यवस्था झाली आहे की नाही हे पाहिल्यानंतरच महानगरपालिकेकडून ओ.सी. दिली जाते. निवेदनामध्ये म्हटल्याप्रमाणे त्या ठिकाणी टाकी खाली आहे आणि वर साठवण करतो त्याची कॉस्ट कोणी भरावी हा प्रश्न आहे. म्हणून महानगरपालिका आयुक्तांना सूचना दिल्या जातील की, यामध्ये निश्चितपणे लक्ष घालून त्या लोकांना पाण्याची अडचण येणार नाही याची दखल घ्यावी.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर.....

हा शासनाचा जॉईन्ट प्रोजेक्ट आहे. ज्यामध्ये खाजगी विकासक खाजगी जमीन घेऊन येईल. त्यांना शासन 3(11) प्रमाणे योजना करण्यास सांगू. फेडरेशनसमोर एनजीओ केलेली आहे. फेडरेशन स्थापन करुन एनजीओ केलेली आहे. कोर्टामध्ये ते गेल्यानंतर फेडरेशनला रिकग्नाईज करण्यात आले. जर अयोग्य मार्गाने पैसे घेतले जात असतील तर एनजीओचीही चौकशी केली जाईल.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी केंद्र शासनाने सुरु केलेल्या क्रांती योजनेची अंमलबजावणी करणे

मु. शी. : रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी केंद्र शासनाने सुरु केलेल्या क्रांती योजनेची अंमलबजावणी करणे यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, अशोक उर्फ भाई जगताप, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात 10 हजार व्यक्तींमागे फक्त एक रुग्णवाहिका अशी परिस्थिती असल्यामुळे उपचाराअभावी मृत्यूमुखी पडणाऱ्या रुग्णांची दिवसेंदिवस वाढणारी संख्या, अपघातग्रस्त, गरोदर महिला व गंभीर आजारी रुग्णांसाठी केंद्र शासनाने सुरु केलेल्या 'क्रांती योजनेच्या' रुग्णवाहिकांमुळे देशातील 16 राज्यांमधील लाखो नागरीकांचे प्राण वाचविले जात असणे, मात्र, गेल्या 7 वर्षापासून सुरू झालेल्या या योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्रात अजूनपर्यंत सुरू झालेली नसणे, राज्यासाठी 937 रुग्णवाहिका मंजूर करण्यात आल्या असून, केंद्र सरकारने 1,050 कोटी रुपयांचा निधी राज्याला देण्यात येऊन राज्यात सर्व रुग्णासाठी सदर योजनेची त्वरीत अंमलबजावणी करण्याची गरज असताना आजही या योजनेची अंमलबजावणी सुरु करण्यात न येणे, यामुळे रुग्णांना तातडीने उपचार मिळत नसणे, यामुळे रुग्णांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

प्रा.फौजिया खान (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवते.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे) 3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, राज्यातील जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने हा फार महत्वाचा विषय आहे. मी सर्व प्रथम माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्री, माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री यांचे अभिनंदन करु इच्छितो. एक चांगली योजना या राज्यामध्ये राबविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतलेला आहे. या विषयी माझे 2-3 प्रश्न आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, ह्या योजनेची सुरुवात सन 2008 मध्ये झाली होती. काही कारणस्तव या योजनेची अंमलबजावणी होण्यास काही तांत्रिक अडचणी आल्या असतील. परंतु आता ज्या स्वरुपात या योजनेची अंमलबजावणी या राज्यामध्ये करावयाची आहे. त्याबाबत माननीय मंत्री महोदयांनी सविस्तर माहिती द्यावी. इर्मजन्सी मेडिकल सर्व्हिस म्हणजे काय ते आज राज्यातील जनतेला समजू शकेल. 937 रग्णवाहिका आहेत त्या तालुका स्तरावर, ब्लॉक स्तरावर, हायवेवर, अपघातस्थळी पोच करणार आहे काय, नेमके त्याचे स्वरुप काय असणार आहे ? त्या रग्णवाहिकांमध्ये कोणत्या सुविधा असतील, आधुनिक यंत्रसामुग्री असेल का, लाईफ सेव्हिंग यंत्रसामुग्री असेल का, त्याचे किती प्रमाण असेल याबाबत त्यांनी सविस्तर माहिती द्यावी.

या योजनेसाठी केंद्राच्या एनआरएचएममधून राज्य सरकारला सहकार्य मिळते. या योजनेचे एकूण किती बजेट आहे आणि त्यासाठी सध्या आर्थिक तरतूद किती करण्यात आली आहे, ही योजना लगेच अंमलात आणली जाणार आहे की, टप्प्याटप्प्याने सुरु करणार आहे, याबाबत काय नियोजन केले आहे ? सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, आपण मला पुन्हा दोन प्रश्न विचारण्याची संधी द्यावी.

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी सांगितल्या प्रमाणे खरोखरच ही मोठी योजना आहे. जगामध्ये रग्णवाहिकेसंबंधी अन्य कोणतीही मोठी योजना अस्तित्वात नाही. या रुग्णवाहिका लोकसंख्येच्या प्रमाणानुसार दिल्या जाणार आहेत. ज्या ठिकाणी 2 लाख लोकसंख्यामागे एक ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट ॲम्ब्युलन्स देणार आहोत. ग्रामीण भागामध्ये 1 लाख लोकसंख्येमागे एक रुग्णवाहिका दिली जाईल. ॲडव्हास लाईफ सपोर्ट ॲम्ब्युलन्सचे प्रमाण 25 टक्के असेल व 75 टक्के बेसिक लाईफ सपोर्ट ॲम्ब्युलन्स असेल. या ॲम्ब्युलन्स अतिसुज्ज सुविधांनी युक्त असणार आहेत. त्यामध्ये डिफिब्रिलेटर, मॉनेटर,

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान....

व्हेण्टिलेटर, डॉक्टर व ड्रायव्हर असेल, डॉक्टर व ड्रायव्हरचे प्रशिक्षण सर्व्हिस प्रोव्हायडरमार्फत केली जाणार आहे. या ॲम्ब्युलन्सची पुण्यामध्ये कंट्रोल रुम राहणार आहे. या कंट्रोल रुमध्ये पोलिसांचे प्रतिनिधी, फायर ब्रिगेडचे प्रतिनिधी असतील, जीपीआरएस सिस्टिम या ॲम्ब्युलन्समध्ये असेल. या ॲम्ब्युलन्ससाठी 108 हा टोल फ्री नंबर असेल. कोणत्याही ठिकाणी अपघात झाला आणि 108 नंबर फिरविला तर त्या कंट्रोल रुममधील लोकांनी ताबडतोब हातामध्ये कर्सर घेऊन अपघताचे ठिकाणी लोकेट करावयाचे आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. फोजिया खान....

आणि ताबडतोबीने फायरब्रिगेड, पोलीस आणि डॉक्टर यांच्याकडे सर्व माहिती जाईल. या योजनेचा मूळ उद्देश हा आहे की, गोल्डन अवर हा लाईफ सेव्हिंग अवर असल्याने त्या एका तासातच मदत मिळाली पाहिजे. ज्यामध्ये सर्व लाईफ सेव्हींग उपकरणे, डॉक्टर्स असतील अशी ही ॲम्ब्युलन्स आहे. डीव्हीजी कंपनीला सर्व्हिस प्रोव्हायडर म्हणून निवडलेले आहे. त्यांनी डॉक्टर्सची निवड केलेली आहे, ट्रेनिंग सुरु केलेले आहे. कंट्रोल रुम देखील दोन महिन्यामध्ये कार्यान्वित होईल. यासाठी वापरण्यात येणारे सॉफ्टवेअर खूप महत्वाचे आहे. जेथे कुठे इमर्जन्सी होईल त्या ठिकाणी लाईफ सेव्हिंग इक्वीपमेण्टसहीत डॉक्टरसहीत मदत पोहोचण्याची ही योजना आहे.

श्री. संजय दत्त : या योजनेसाठी बजेटरी प्रोव्हीजन किती आहे ?

प्रा. फौजिया खान : यासाठी 1096 कोटी रुपये एवढे बजेट देण्यात आलेले आहे. केन्द्र शासनाच्या एनआरएचएम योजनेतून आपण मदत मागितलेली आहे. ही केन्द्र सरकारची योजना नाही. ही योजना राज्याची आहे. परंतु या योजनेसाठी आपण केन्द्राच्या एनआरएचएम योजनेतून पैसा मागितलेला आहे. केन्द्राने निधी देण्याची तयारी दर्शविलेली आहे. 690 गाडयांचे कॅपिटल एक्स्पेण्डिचर, मेण्टेनन्स केन्द्र सरकार देणार आहे. त्या शिवाय प्रत्येक वर्षी 80 टक्के, 60 टक्के, 40 टक्के, 20 टक्के या प्रमाणे राज्य सरकार आपला हिस्सा देणार आहे. या योजनेसाठी राज्य शासनाने 247 कोटी रु. देण्याचा निर्णय घेतलेला आहे. अशा पध्दतीने केन्द्र आणि राज्य सरकारच्या मदतीने ही योजना आपल्या राज्यात सुरु होणार आहे.

श्री. भाई जगताप : आघाडी सरकारने अतिशय महत्वाकांक्षी आणि पवित्र अशी योजना सुरु करण्याचा निर्णय घेतलेला आहे. हा ऐतिहासिक निर्णय आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले ते खरे आहे, अपघात झाल्यानंतरचा एक तास फार महत्वाचा असतो, एका तासातच लाईफ सपोर्ट देता आला तर अनेक जीव वाचू शकतात अशी पवित्र भावना या योजनेमागे आहे. त्यामुळे या योजनेबाबत कुणाच्याही मनामध्ये किंतु नाही. या योजनेसंबंधीचे प्रकरण कोर्टामध्ये होते. कोर्टाने स्टे दिला होता. खालच्या कोर्टापासून सुप्रीम कोर्टापर्यन्त प्रकरण गेले. 18.3.2010ला कोर्टाचा निर्णय झाला. त्याला तीन वर्षे झाली. बजेटरी प्रोव्हीजन बाबत आपण सभागृहाला सांगितले. दिनांक 18.3.2010च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत सेवा पुरवठादाराची निवड करण्याची प्रक्रिया

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. भाई जगताप...

राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्या विरोधातही प्रकरण कोर्टामध्ये गेले होते आणि कोर्टाने ते, अपहेल्ड केले, मान्य केले, हे निवेदनामध्येच आहे. ही योजना आपण आणत आहोत. या योजनेसंबंधी या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झाली. त्या चर्चेला आपण समर्पक उत्तर दिलेले आहे. या योजनेसंबंधी सरकारने खूप चांगले काम केलेले आहे. माननीय मंत्री महोदयांनी यामध्ये पुढाकार घेतलेला असल्यामुळे त्या देखील अभिनंदनास पात्र आहेत. राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांचे आणि उप मुख्यमंत्र्यांचे देखील यामध्ये मोठे योगदान आहे. या प्रक्रियेमध्ये तीन वर्षे गेली. आता आपण सन 2013मध्ये आहोत. बजेटरी प्रोव्हीजन केलेली आहे. आपली मेण्टेनन्सची अडचण होती ती देखील केन्द्राने घेतली. त्यामुळे या ॲम्ब्युलन्स रस्त्यावर केव्हा धावतील आणि त्यांच्या उपयोग नागरिकांना केव्हा पासून होईल. ?

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, यात थोडासा गैरसमज असा आहे की, दिनांक 13.3.2010 रोजी सुप्रीम कोर्टाचा पहिला निकाल आला होता. त्याच्यानंतर आपण टेंडर प्रोसेसने सर्व्हिस देण्याचा आपण निर्णय घेतलेला आहे. या गोष्टीस मंत्रिमंडळाची मान्यता देखील घेतलेली आहे. या बाबतीत ज्या संस्थांना अपात्र ठरविल्या होत्या, त्या संस्थांनी पुन्हा हायकोर्टात केस टाकली आणि हायकोर्टाने दिनांक 11.5.2012 रोजी निर्णय दिला. सुप्रीम कोर्टाने दिनांक 20.7.2012 रोजी निर्णय दिला. या दोन्ही केसमध्ये ते हरले आणि यासंदर्भात दोन्ही निकाल शासनाच्या बाजूने दिलेले आहेत. या बाबतीत उशीर होण्याचे कारण...

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, यामध्ये कन्फ्यूजन असे आहे की, दिनांक 15.8.2008 मध्ये तत्कालीन कॅबीनेटने ग्रामीण भागात ॲम्ब्युलन्स चालू करण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी असाही निर्णय झाला होता की, आंध्र प्रदेशातील जी कंपनी ॲम्ब्यूलन्स सर्व्हीस चालवित होती, त्या कंपनीस विदाऊट टेंडर काम द्यावे. त्या निर्णयाच्या विरोधात सुप्रीम कोर्टात 2008 मध्ये केस दाखल केली गेली. मी आरोग्य मंत्री झालो त्यावेळी श्री.अशोक चव्हाण हे राज्याचे मुख्यमंत्री होते. आपण टेंडर प्रोसस आऊट करुन नवीन टेंडर फ्लोट करावयाचे आणि ग्रामीण भागातच नव्हे तर शहरी भागात म्हणजे मुंबई, नागपूर, औरंगाबाद आणि पुणे या ठिकाणी सुविधा देण्याचा निर्णय त्यावेळी आम्ही घेतला. त्यानंतर दिनांक 3 ऑगस्ट, 2011 रोजी टेंडर फ्लोट केले. त्याची प्रथम बैठक दिनांक 23 ऑगस्ट 2011 रोजी झाली. टेक्निकल प्रेझेंटेशन, फायनांशिल बीड इत्यादी कामे फेब्रुवारी, 2012 पर्यंत संपली. त्यानंतर ही केस हायकोर्टात गेली.

महोदय,मुंबई हायकोर्टात दिनांक 11 मे, 2012 रोजी राज्य शासनाच्या फेवरचा निकाल लागला. ते टेंडर प्रोसेसवर चॅलेंज करीत होते. त्यांचे म्हणणे होते की, आरोग्य विभागाने टेंडर प्रोसेस बरोबर केलेली नाही. त्यानंतर सेम पार्टी सुप्रीम कोर्टात गेली. सुप्रीम कोर्टाने दिनांक 20 जुलै, 2012 मध्ये महाराष्ट्र शासनाच्या बाजूने निकाल दिला. त्यांनतर थोडा कालावधी गेला. एका कंपनीने सन्माननीय राष्ट्रपती, सी.बी.आय., इ.बी.,कॅग तसेच सर्व सन्माननीय आमदार, सर्व खासदार यांच्याकडे महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाच्या विरोधात तक्रारी केल्या. त्या कंपनीने दिनांक 29 फेब्रुवारी 2011 मध्ये पुन्हा सदर केस हायकोर्टात दाखल केली. तसेच कॅगमध्ये तक्रार केली होती. इतिहासात पहिल्यांदाच असे घडले असेल की, टेंडर देण्याच्या अगोदर कॅगकडून

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी...

फायनान्शियअल इन्क्वायरी झाली. आम्ही सांगितले की, ठीक आहे. कॅग कडून ऑडीट करुन घेण्याबाबतची बाब आम्ही मान्य केली. तो पर्यंत आम्ही कोणालाही टेंडर दिले नाही. अकाऊंन्टंट जनरल यांनी दिनांक 22.10.2012 रोजी अहवाल दिला. कॅगने एक त्रुटी काढली होती, त्या त्रुटींची पूर्तता दिनांक 10.11.2012 रोजी करुन दिली आहे. त्यानंतर कॅगने क्लिअरन्स दिला. याबाबतीत सर्व्हिस प्रोव्हायडर यांचा मेमोरंडम ऑफ अंडरस्टँडींगबद्दल वाद होता.

यानंतर श्री. भोगले

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्रमांक-4 श्री.सुरेश शेट्टी....

15 ऑगस्टनंतर डिसेंबर, 2013 पर्यंत 450 ॲम्ब्युलन्स रस्त्यावर कार्यरत होणार आहेत आणि मार्च अखेरपर्यंत राज्यात 937 ॲम्ब्युलन्स कार्यरत करीत आहोत आणि त्याद्वारे ही सेवा देणार आहोत.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, राज्याच्या आरोग्य खात्यात आज डॉक्टरांची कमतरता आहे. रुग्णालयात पुरेसे डॉक्टर्स, नर्सेस उपलब्ध नाहीत. या यंत्रणेसाठी 937 डॉक्टर्स आणि तेवढ्याच नर्सेसची आवश्यकता आहे. एवढे डॉक्टर्स कुठून उपलब्ध करुन देणार आहात? ॲम्ब्युलन्स आहेत आणि डॉक्टर नाही असे होता कामा नये. प्रत्येक ॲम्ब्युलन्सकरिता डॉक्टर आणि नर्स यांची पूर्तता कशी करणार आहात?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाबाबत मी सांगू इच्छितो की, प्रत्येक ॲम्ब्युलन्ससाठी डॉक्टर देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. आठ तासाची एक शिफ्ट याप्रमाणे दिवसाकरिता 3 डॉक्टर्स एका ॲम्ब्युलन्ससाठी लागणार आहेत. आपल्या राज्यात जो कायदा आहे त्या कायद्यान्वये या ॲम्ब्युलन्समध्ये कार्यरत असणारे पॅरामेडिक आणि ड्रायव्हर यांना इंजेक्शन देणे, ऑक्सीजनचा पुरवठा करणे, मेडिकल ट्रिटमेंट करण्यास अनुमती नाही. त्या ॲक्टमध्ये अमेंडमेंट करण्यासाठी वेळ लागला असता. म्हणून आयुर्वेदिक, होमिओपॅथी आणि युनानी डॉक्टरांना तीन महिन्याचे विशेष प्रशिक्षण देऊन त्यांची या ॲम्ब्युलन्समध्ये पोस्टिंग करणार आहोत. या तीनही पॅथीमधील डॉक्टरांना बेसिक ट्रेनिंग देऊन डिझास्टर स्पॉटमध्ये जी ऑन दी स्पॉट ट्रिटमेंट द्यावी लागेल ते ट्रेनिंग देणार आहोत. कंट्रोल रुममध्ये स्पेशालिस्ट बसलेले असतील ते त्यांना इमर्जन्सीमध्ये काय प्रोसीजर ऑप्ट करायची याबाबत वायरलेसद्वारे गाईड करतील. हे बेसिक कारण आहे. आपण सांगितले की, डॉक्टर्स उपलब्ध होत नाहीत. आपण राज्यात पालघर येथे माननीय सोनिया गांधी यांच्या हस्ते बाल स्वास्थ्य कार्यक्रमाचे उद्घाटन केले. एक महिन्यात आपण ॲडहॉक बेसीसवर 2225 डॉक्टर्स अपॉइंट केले. कारण त्यात रोस्टरचा किंवा रिझर्व्हेशनचा प्रॉब्लेम नाही. या योजनेसाठी देखील आपण हीच पध्दत अवलंबिणार आहोत. डॉक्टर्स आणि ड्रायव्हर्स यांच्यासाठी सर्व्हिस प्रोव्हायडर ऑलरेडी अपॉईंट केले आहेत. काही डॉक्टरांचे ट्रेनिंग स्टार्ट झालेले आहे. इतर आरोग्य विभागाचे व्हेकन्सीज आहेत त्याबाबत कॅबिनेटमध्ये आम्ही वर्ग 3 च्या रिक्त पदांचा मुद्दा उपस्थित केला होता. माननीय मुख्यमंत्र्यांनी वर्ग

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

3 ची 5000 पदे मंजूर केली असून सामान्य प्रशासन विभागाने ही पदे रिक्रूट करण्यास आम्हाला परवानगी दिली आहे. डॉक्टरांचे आर.आर.चे रुल्स चेंज करायचे होते त्याचे ॲप्रूव्हल सन्माननीय राज्यपाल महोदयांकडून आलेले आहे. ती भरती ऑक्टोबरमध्ये होणार आहे. जी आरोग्य विभागातील 3000 डॉक्टरांची पदे रिक्त आहेत ती ऑक्टोबर एंडपर्यंत आरोग्य खात्यामध्ये रिक्रूट करणार आहोत.

नंतर पी.1...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: माननीय सभापती महोदयांचा अवमान करणारे अत्यंत अशोभनीय व बेशिस्त वर्तन करणे

मु.शी.: माननीय सभापती महोदयांचा अवमान करणारे अत्यंत अशोभनीय व बेशिस्त वर्तन केल्याबाबत सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या निलंबनाबाबत संसदीय कार्य मंत्र्यांचा प्रस्ताव.

श्री. हर्षर्धन पाटील (संसदीय कार्य मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील प्रस्ताव मांडतो.

आज दिनांक २६ जुलै, २०१३ रोजी मा.सभापती, महाराष्ट्र विधान परिषद यांच्या दालनात महाराष्ट्र विधान परिषद नियम २६० अन्वये सिंचन गैरव्यवहाराच्या चौकशीबाबत घेण्यात येणाऱ्या प्रस्तावाच्या संदर्भात मा.मुख्यमंत्री, मा.उप मुख्यमंत्री, मा.विरोधी पक्ष नेते व विविध पक्षाचे गट नेते यांच्या समवेत चर्चा सुरू असताना श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांनी या चर्चेदरम्यान मा.सभापती यांचा अवमान करणारे अत्यंत अशोभनीय व बेशिस्त वर्तन केले. श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांच्या असभ्य व आक्षेपार्ह वर्तनामुळे संसदीय शिष्टाचार व संकेताचा भंग झाला असून मा.सभापती यांचा अवमान व उपमर्द झाला आहे. श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांच्या या अशोभनीय व मा.सभापती यांची प्रतिष्ठा मलिन करणाऱ्या अत्यंत आक्षेपार्ह स्वरुपाच्या गैरवर्तनाबद्दल ही विधान परिषद असा ठराव करीत आहे की, त्यांचे सदस्यत्व दिनांक ३१ डिसेंबर, २०१३ पर्यंत निलंबित करण्यात यावे. तसेच सदरहू निलंबनाच्या कालावधीत त्यांना विधानमंडळाच्या मुंबई व नागपूर येथील परिसरात येण्यास बंदी घालण्यात यावी.

सभापती महोदय, हा प्रस्ताव संमत करण्यात यावा, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

उप सभापती : आता मी हा प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी केंद्र शासनाने सुरु केलेल्या क्रांती योजनेची अंमलबजावणी करणे

मु. शी. : रुग्णांचे प्राण वाचविण्यासाठी केंद्र शासनाने सुरु केलेल्या क्रांती योजनेची अंमलबजावणी करणे यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, अशोक उर्फ भाई जगताप,श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री चंद्रकांत पाटील,विनोद तावडे, भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

(चर्चा पुढे सुरु .....

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाने अतिशय महत्वाची योजना हाती घेतली असून तिची कार्यवाही देखील सुरु झालेली आहे. शासनाचा हा स्तुत्य उपक्रम असून तो सामान्य जनतेच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे. हा जो उपक्रम आपण सुरु केलेला आहे त्याची माहिती प्रसार माध्यमांमध्ये वारंवार येत राहणे तसेच या संदर्भात लोकजागरण करण्याची नितांत आवश्यकता आहे. शासन सर्वसामान्य जनतेसाठी चांगल्या चांगल्या योजना आणत असते. या ठिकाणी एक रुग्णवाहिकेचा उल्लेख करण्यात आलेला आहे. परंतु यामध्ये एक रुग्णवाहिका नसेल तर त्यामध्ये दोन तीन युनिट्सचे फ्लिट असण्याची शक्यता आहे. आपण जर या रुग्णवाहिकेबरोबर स्टाफ देणार असू, मेडिसीन देणार असू, प्रत्येक रुग्णवाहिकेमध्ये सर्व प्रकारची साधने काही बसविता येत नाहीत. त्यामुळे यासंदर्भातील सपोर्ट व्हेईकल सुध्दा यामध्ये असण्याची शक्यता आहे. त्यामुळे यातील मॉडेल रुग्णवाहिका आणि त्याचे इन्फ्रास्ट्रक्चर्सच्या संदर्भात माहिती दिली तर आम्हाला त्यासंदर्भात अधिक माहिती मिळू शकेल. यासंदर्भातील योग्य ती माहिती लोकांपर्यंत पोहचावी, जनतेने त्याचा उपयोग करावा यासाठी आपण जनजागरण मोहीम हाती घेतली जाणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी जनजागृतीच्या संदर्भात मुद्दा उपस्थित केलेला आहे त्यासंदर्भात सजेशन फॉर ॲक्शन. तसेच त्यांनी दुसरा मुद्दा रुग्णवाहिकेबरोबर दुसरे व्हेईकल राहणार आहे काय असा मुद्दा उपस्थित केला असून यासंदर्भात मी सांगू इच्छिते की, या रुग्णवाहिकेबरोबर दुसरे व्हेईकल राहणार नाही. परंतु रुग्णवाहिकेमध्ये व्हेन्टीलेटर, मॉनिटर, डि-फॅब्रिलेटर ही सर्व उपकरणे रुग्णवाहिकेमध्येच राहणार असून त्यामध्ये डॉक्टर आणि ड्रायव्हर सुध्दा राहणार आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. निरजंन डावखरे : सभापती महोदय, राज्य शासनाच्या तसेच केंद्र सरकारच्या मदतीने एक स्तुत्य कार्यक्रम राबविला जात आहे. परंतु या चांगल्या योजनेला मधील काही अडचणीमुळे दोन वर्षाचा वेळ वाया गेलेला आहे. दोन वर्षाचा वेळ गेल्यामुळे किंमतीमध्ये काही फरक पडणार आहे काय ?

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.निरंजन डावखरे....

आपण ऑलरेडी एकदा टेंडर प्रोसेसिंग केलेले आहे. आपण स्पेसिफिक टेंडर प्रोसेस केले होते त्यामध्ये मेन्शन केलेली कॉस्ट आणि आताच्या कॉस्टमध्ये काही फरक येणार आहे काय ? सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी सांगितल्याप्रमाणे हा उपक्रम जास्तीत जास्त लोकांसमोर गेला पाहिजे व त्यांनी याचा फायदा घेतला पाहिजे. यासाठी कॉल सेंटर उघडून यासंबंधातील प्रसिद्धी प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून शासन करणार आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, या रूग्णवाहिकेच्या सेवेसाठी कॉल सेंटर उघडण्यात येणार असून या कॉल सेंटरचा दूरध्वनी क्रमांक 108 असा राहणार आहे. हा टोल फ्री नंबर आहे. यासंबंधातील माहिती सर्वांना कळावी म्हणून योग्य ती प्रसिद्धी शासनामार्फत करण्यात येणार आहे. सदर प्रसिद्धी ही जिंगल्स, होर्डिंग्ज यांच्या माध्यमातून देखील करण्यात येणार आहे. तसेच, कॉस्टमध्ये देखील काही फरक होणार नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, सदर योजना ही देशातील आंध्र प्रदेश, राजस्थान, गुजरात या राज्यात अंमलात आलेली आहे. काही तांत्रिक कारणामुळे ही योजना आपल्या राज्यात अंमलात आणण्यासाठी वेळ गेलेला आहे. तेव्हा या वेळेचा उपयोग करून ही योजना इतर राज्यात अंमलात आणताना ज्या त्रुटी आढळून आल्या आहेत त्याचा अभ्यास आपल्या राज्याने केला आहे काय, तो यात कव्हर करण्यात आला आहे काय ? गुजरात राज्या विषयी असे सांगितले जाते की, तेथील रूग्णवाहिकांमध्ये अत्यंत लो क्वालिटीची इक्विपमेंटस् वापरण्यात आली आहेत. तेव्हा यासंबंधी माझा प्रश्न असा आहे की, त्याचा अभ्यास आपण केला आहे काय ? आपली योजना बनविताना आपण या पद्धतीची काळजी घेतली आहे काय ? योजना या चांगल्या असतात. पण योजनांची अंमलबजावणी होत असताना क्वालिटी कंट्रोल तसेच मॉनिटरींग करणे आवश्यक असते. तशा प्रकारची योजना आपल्याकडे आहे काय ?

माझा तिसरा प्रश्न राज्यात असलेल्या सुमारे 2900 रूग्णवाहिकांसबंधात आहे. आज या रूग्णवाहिकांची कंडिशन काय आहे हे सर्वांना माहीत आहे. त्याबाबत शासनाची विशेष काही योजना आहे काय, त्यासंबंधी शासन काय करणार आहे ? या प्रश्नांची उत्तरे माननीय मंत्री महोदयांनी द्यावीत.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी दुसऱ्या राज्यात रूग्णवाहिका सेवा आहेत त्यासंबंधी आपण अभ्यास केला आहे काय, असा प्रश्न विचारला आहे. आपण ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स (एम्स), नवी दिल्ली या संस्थेला सल्लागार नेमले आहे. या संस्थेच्या प्रतिनिधीं बरोबर मी स्वत: आंध्र प्रदेशला जाऊन आलो आहे. तसेच, काही अधिकारी हे गुजरात येथे जाऊन अभ्यास करून आले आहेत. एम्स ही भारतातील नावाजलेली संस्था आहे. त्यांच्या स्पेशालिस्टनी पूर्ण अभ्यास करून रूग्णवाहिकेसाठी आवश्यक असलेले स्पेसिफिकेशन तयार केले आहे. देशात कुठल्याही रूग्णवाहिकांमध्ये नसतील अशा प्रकारची इक्विपमेंटस आपल्या रूग्णवाहिकांमध्ये वापरण्यात येणार आहेत. एवढी सॉफीस्टीकेटेड साधनसामुग्री देशातील कुठल्याही रूग्णवाहिकेमध्ये नसतील. ॲडव्हान्स लाईफ सिस्टीमध्ये 38 व 35 टाईपचे इक्विपमेंट घेतलेले आहे. एवढे चांगले इक्विपमेंट रूग्णवाहिकेसाठी का घेत आहात असा मुद्दा उपस्थित करून वाद घालण्यात आला होता. भारतात आणि आशियामध्ये एवढी अत्याधुनिक रूग्वाहिका नाही. अशा रूग्णवाहिका फक्त युरोप मध्ये आहेत. मी या सभागृहामध्ये सांगितले होते की," Whatever facilities are available to the citizens of Europe, why they should not be available to the citizens of Maharashtra? मला सांगण्यात आले होते की, येथील रस्ते बरोबर नसल्यामुळे इक्विपमेंट खराब होईल. हे सर्व लक्षात घेऊन We are going to get one of the finest ambulance service in the State. त्याचा लोकांना निश्चितच फायदा होईल. या सेवेला प्रसिद्ध देण्याचे काम आम्ही सुरू केलेले आहे. जिंगल्स, फिल्म करण्याच्या कामास आम्ही सुरूवात केली आहे. गुजरात मध्ये देखील आमचे अधिकारी दोन दिवस गेले होते. तेथे जाऊन कॉल सेंटर्स, रूग्णवाहिकांची पाहणी करण्यात आली आहे. मला खात्री आहे की, डिसेंबर पर्यंत आपल्या राज्यात 50 टक्के सेवा पुरविण्यात येईल व लोकांना चांगल्या पद्धतीची, फायदेशीर अशी सेवा देण्यात येईल. सध्याच्या आपल्या 2000 रूग्णवाहिकांना रि-फर्निश करण्यात येईल. यासाठी 102 हा दूरध्वनी क्रमांक देण्यात येईल. 102 व 108 या दोन्ही दूरध्वनी क्रमांकाच्या सेवांसाठी औंध येथेच कॉल सेंटर राहणार आहे. नॉन इमर्जन्सी कामासाठी रूग्णांना रूग्णालयात न्यावे लागते. जननी शिशु सुरक्षा अंतर्गत गर्भवती महिलांना आपण ट्रान्सपोर्ट प्रोव्हाईड करतो.

यानतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी...

या कामांसाठी त्या रुग्णवाहिका वापरणार आहोत. आपण या रुग्णवाहिका मॉडीफाय करुन त्या जीपीएस सिस्टीममध्ये आणणार आहोत. या दोन्ही प्रकारच्या रुग्णवाहिकांचे नियंत्रण पुणे येथून होणार आहे.

श्री.मनिष जैन : सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागाचा हा चांगला उपक्रम आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, आम्ही या कामास सन 2008 पासून सुरुवात केली. सन 2010 च्या मंत्रिमंडळात हा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. ही सिस्टिम आणण्यासाठी किती लढाई करावी लागली हे सांगितले. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. या ठिकाणी माननीय राज्यमंत्रिमहोदयांनी सांगितले की, रुग्णवाहिका देताना त्यासाठी एक लाख आणि दोन लाख लोकसंख्येचा निकष लावलेला आहे. या रुग्णवाहिकांचे चार्जेस कशाप्रकारे आकारण्यात येणार आहेत, या बाबत शासनाचे काय नियोजन आहे याचा खुलासा करण्यात येईल काय ? या ठिकाणी सांगण्यात आले की, या रुग्णवाहिकांमध्ये लाईफ सेव्हींग ड्रग्ज ठेवण्यात येतील. हे लाईफ ड्रग्ज संपल्यानंतर त्याचा पुरवठा कोठून करण्यात येणार आहे, या ड्रग्जचा साठा कोठे ठेवला जाणार आहे ? या रुग्णवाहिकांचे मेन्टनन्स करण्यासाठी ओएमसी कशी करणार आहात ? 108 या टोल फ्री क्रमांकावर ही सुविधा उपलब्ध होणार आहे. या टोल फ्री क्रमांकावर मराठी भाषा असणार काय, मराठी भाषेव्यतिरिक्त अन्य कोणत्या भाषा असणार आहेत ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तीन-चार प्रश्न विचारले. मी शेवटच्या प्रश्नापासून सुरुवात करतो. कॉल सेंटरमध्ये मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांचे जाणकार असलेले लोक असतील. जास्त करुन मराठी भाषेत संवाद राहील. परंतु शहरी भागांमध्ये हिंदी तसेच इंग्रजी भाषेचा वापर होत असल्यामुळे या दोन्ही भाषांमध्ये देखील संवाद राहील. आपण तिन्ही भाषांची प्रोव्हीजन करणार आहोत.

सभापती महोदय, एनआरएचएममध्ये पाच लाख लोकसंख्येकरिता एक रुग्णवाहिका असा नियम आहे. परंतु आपण ग्रामीण भागात एक लाख लोकसंख्येसाठी एक रुग्णवाहिका असा निकष लावला आहे. म्हणजे एका तालुक्यात कमीत कमी दोन रुग्णवाहिका मिळतील. शहरी भागासाठी दोन लाख लोकसंख्येसाठी एक रुग्णवाहिका असा निकष आहे. मुंबई भागातील ट्रॅफिक आणि गर्दीचा विचार करुन एक लाख लोकसंख्येसाठी एक रुग्णवाहिका असा निकष लावलेला आहे

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सुरेश शेट्टी.....

सभापती महोदय, या रुग्णवाहिकांमध्ये रेग्युलर मेडीसीन असणार नाहीत तर इमर्जन्सीसाठी जी औषधे लागतात ती ठेवण्यात येतील. रुग्णालयात पोहोचेपर्यंत रुग्णाला तातडीने उपचार मिळावेत अशी या मागची धारणा आहे. यासंबंधी आवश्यक असणारे मॅपिंग आम्ही केलेले आहे. राजीव गांधी जीवनदायी योजनेतील एम्पॅनल्ड रुग्णालये तसेच शासकीय रुग्णालयांचा यामध्ये समावेश करण्यात आला आहे.

उप सभापती : विशेष उल्लेख आणि औचित्याचे मुद्दे मध्यंतरानंतर घेण्यात येतील.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 2.15 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 1.34 ते 2.15 पर्यंत मध्यंतर)

यानंतर श्री.बोर्डे...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.किरण पावसकर)

तालिका सभापती (श्री.किरण पावसकर) : सभागृहात माननीय मंत्री उपस्थित नसल्यामुळे सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक दुपारी 2.15 वाजता 5 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली आहे.)

नंतर श्री.बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. किरण पावसकर)

पृ.शी./मु.शी. : औचित्याचे मुद्दे

तालिका सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री. मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

राज्यातील 493 धरणांच्या दुरुस्तीची कामे निधी नसल्यामुळे होऊ शकलेली नाहीत. खडकवासला धरणापासून पुणे शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी पुढे जो 20 किलोमीटर मोठा जातो तो धोकादायक झाला आहे. भैरोबा नाल्यावरील जलसेतूजवळ कालव्याचा बांध फूटून लाखो लिटर पाणी वाया गेले. नागरिकांच्या दक्षतेमुळे कोठलीही हानी झाली नाही. पाणी अत्यंत वेगाने वाहिल्यामुळे कमकुवत असलेली सीमा भिंत ढासळून 30 फूट मोठे भगदाड पडले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी.....

कालव्याची सीमा लगत जी भींत आहे, ती दुरुस्त करण्यासाठी वेळोवेळी मागणी केलेली आहे. नवीन व जुन्या मुठा कालव्या लगतच्या जागेवर आजूबाजूला झोपडपट्टयांचेही अतिक्रमण झालेले आहे. या सर्व बाबींचा विचार केला तर पुणे शहराचा 65 टक्के पाणी पुरवठा पाईप लाईनमधून होतो आणि 35 टक्के पाणी पुरवठा या कालव्याद्वारे होतो. या कालव्याची आजची परिस्थिती चांगली नाही. त्याची वेळेवर दुरुस्ती केली नाही तर भविष्यामध्ये दुर्घटना होऊ शकते. हा कालवा फुटला तर पुणे शहरातील मध्य वस्तीतील पाणी पुरवठा 8 दिवस पूर्णपणे बंद होईल, अशी धोकादायक परिस्थिती निर्माण झालेली आहे. म्हणून मी आपल्या माध्यमातून शासनाला विनंती करतो की, आधुनिक यंत्रसामुग्री गोळा करण्यासाठी आठ दिवसांचा कालावधी लागेल. तोपर्यंत पुण्याचा पाणी पुरवठा 8 दिवस बंद ठेवता येणार नाही. त्यामुळे दर महिन्याला 2 दिवस पुण्याच्या पाणी पुरवठ्याची पर्यायी व्यवस्था करावी. या कालव्याच्या भिंतीला जेथे जेथे भगदाडे पडलेली आहेत त्यांची दुरुस्ती करावी. हे काम शासनाने युध्द पातळीवर करावे अशी मी शासनाला विनंती करतो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: पुणे जिल्ह्यातील खटल्यांची वाढती संख्या लक्षात घेता महिला अत्याचार विषयक खटले वेगाने निकाली काढण्यासाठी न्यायाधीशांची नियुक्ती करणे

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

काही काळापासून महिलांवरील अत्याचारांचे प्रमाण मोठ्या प्रमाणामध्ये वाढलेले आहे. माननीय उच्च न्यायालयाने महिलांवरील अत्याचाराचे खटले चालविण्यासाठी स्वतंत्र न्यायाधीशांची नियुक्ती करण्याचे आदेश दिले आहेत. पुणे जिल्ह्यातील महिलांविषयक सर्व खटले एकत्र करुन महिलांविषयक खटले चालविण्यासाठी विशेष न्यायाधीशांकडे वर्ग करण्यात आले. परंतु खटल्यांची संख्या प्रचंड असल्यामुळे व खटले निकाली निघण्याचे प्रमाण अल्प आहे. एकाच न्यायालयामध्ये 900 पेक्षा अधिक खटल्यांचा डोंगर उभा असल्यामुळे या पीडित महिलांना न्याय मिळेल की नाही अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे. वर्ग करण्यात आलेले काही खटले अंतिम टप्प्यात आलेले आहेत. खराडी येथील नयना पुजारी बलात्कार व खून खटला अशासारखे निघृण हत्येचे खटले या न्यायालयात वर्ग करण्यात आलेले आहेत. तरी या विशेष उल्लेखाद्वारे माझी शासनाला विनंती आहे की, पुणे जिल्ह्यातील महिलांवरील अत्याचारांच्या खटल्यांची संख्या विचारात घेता महिला अत्याचार विषयक खटले वेगाने निकाली काढण्यासाठी आणखी 3 न्यायाधीशांची नियुक्ती करण्यात यावी.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: औचित्याचे मुद्दे

सभापती : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

यंदा कनिष्ठ महाविद्यालयातील प्रवेशासाठी शासनाने ऑनलाईन पध्दत अंमलात आणली आहे. ह्या प्रक्रियेत अनेक तांत्रिक अडथळे निर्माण झाल्याने विद्यार्थ्यांना प्रचंड त्रास सहन करावा लागला होता. ह्याच पध्दतीने मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण अभ्यासक्रमासाठी (Distence learning) सुध्दा ऑनलाईन प्रणाली वापरण्यात येत आहे. मुंबई विद्यापीठामध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 1 लाखाच्या आसपास आहे. परंतु महाराष्ट्र नॉलेज कॉर्पोरेशन लिमिटेड ही या ऑनलाईन सिस्टिमची वेबसाईट होस्ट करते. त्यांच्याकडेन ऑनलाईन प्रक्रिया व्यवस्थित पार पडत नसल्याचे निष्पन्न झालेले आहे. प्रवेशाचा अंतिम दिनांक 27 जुलै, 2013 असल्याने बहुसंख्य विद्यार्थी वंचित राहण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. ही डेडलाईन उद्या बंद होणार आहे. यापूर्वीची डेड लाईन 6 जून, 2013 अशी होती. ही डेडलाईन तेव्हाही पूर्ण करता आली नाही आणि आताही पूर्ण होऊ शकत नाही. त्यामुळे हे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. सामान्यपणे नोकदार आहेत किंवा रोजीरोटी करतात, रात्र शाळांमध्ये शिकलेले आहेत असे विद्यार्थी दूरस्थ शिक्षणामध्ये प्रवेश घेत असतात. त्यामुळे दि.27 जुलै, 2013 च्या डेडलाईनबाबत शासनाने हस्तक्षेप करुन किमान दिनांक 16 ऑगस्ट, 2013 पर्यंत वाढविण्याबाबत संबंधितांना सूचना द्याव्यात, अशी मागणी मी या निमित्ताने करीत आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"संततधार पाऊस, शहरात साचलेला कचरा आणि वेळेवर न होणारी धुवारणी यामुळे कल्याण, डोंबिवली शहराचे आरोग्य बिघडले आहे. कल्याण-डोंबिवलीत मलेरियाने दोन जणांचा मृत्यू झाल्याने शहरात खळबळ उडाली आहे. पालिकेच्या आरोग्य विभागाने केलेल्या सर्वेक्षणात गेल्या दोन महिन्यात 117 जणांना मलेरियाची लागण झाली आहे. तर विषमज्वराचे 200, काविळीचे 70, डेंग्यूचे 30 आणि अतिसराचे 69 रुग्ण आढळलेले आहेत. शहरातील कचरा वेळेवर उचचला जावा यासाठी महापालिका प्रशासनाने वाहनांची आणि चालकांची संख्या वाढविली असली तरी प्रत्यक्षात शहरातील कचरा उचलण्यास टाळाटाळ होत आहे. रस्त्याच्या कडेला असलेल्या कचराकुंडया तुटलेल्या असून त्यातील कच-यामुळे नागरिकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत असून शहरात आजारांचा फैलाव होण्यास सुरुवात झाल्याचा नागरिकांचा आरोप आहे. दोन दिवसांपूर्वीच दीपक मळेकर व संतोष लिंबू या दोघांचा मलेरियाने मृत्यू झाला त्यामुळे जनमानसात संताप व चिडीची भावना निर्माण झाली आहे,ग्रामीण रुग्णालय अपुरे पडत आहे. कल्याण-डोंबिवली शहरात झपाट्याने फैलावत असलेल्या या आजारांचा फैलाव वाढू नये यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलून कार्यवाही करावीअशी मागणी मी या औचित्याचया मुद्याद्वारे करीत आहे."

सभापती महोदय, माझ्या औचित्याच्या मुद्याची गांभीर्याने नोंद घेऊन प्रशासनाला योग्य त्या सूचना द्याव्यात अशी माझी विनंती आहे.

श्री. पद्माकर वळवी (क्रीडा व युवक कल्याण मंत्री) : सभापती महोदय, नोंद घेतलेली आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"शासनाने शासन परिपत्रक दिनांक 18 मे 2013 रोजीच्या शासन निर्णयानुसार सरकारी सेवेतील मागासवर्गीय प्रवर्गातील सेवानिवृत्त कर्मचा-यांना जुलै 2013 पूर्वी जात पडताळणी करुन घेण्याचे आदेश दिलेले असणे, जे कर्मचारी दिनांक 15 जून 1995 नंतर सेवानिवृत्त झाले अशा सर्वांना जात पडताळणी बंधनकारक केलेली असणे, जे कर्मचारी जात पडताळणी करणार नाहीत अशा सेवानिवृत्त कर्मचा-यांचे निवृत्तीवेतन तत्काळ थांबविण्याचे आदेश असणे, अनेक कर्मचारी दुर्धर आजारांचा सामना करीत असल्यामुळे गावोगावी जाऊन कागदपत्रे जमविणे आणि सरकारी कार्यालयांमध्ये खेटा मारणे त्यांना जिकिरीचे होत असणे, त्यामुळे शासनाने या वृद्धांची थट्टा थांबवून या जाचक निर्णयाचा पुनर्विचार करुन या निर्णयातून सेवानिवृत्तांना वगळण्यात यावे, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे."

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. निरंजन डावखरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे स्मारक अरबी समुद्रामध्ये उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तथापि छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक उभारण्यासाठी पर्यावरणविषयक परवानग्या मिळणे बाकी असल्याचे सांगण्यात येत आहे. वास्तविक सदर स्मारक हे अरबी समुद्रामध्ये नेमके कोणत्या ठिकाणी उभारायचे याबाबतचे नियोजन झाले असले तरी विकास आराखडा तयारच नसल्यामुळे पर्यावरणविषयक परवानग्या प्राप्त होण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. तेव्हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाच्या संदर्भात प्रथमत: नियोजन आणि विकास आराखडा तातडीने तयार करण्यात यावा, यासाठी मी हा औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणा-या विविध चॅनेलद्वारा चित्रपट, जाहिराती व विविध विषयावरील मालिका, गाणी तसेच अन्य कार्यक्रमातून हिंसाचार आणि अश्लीलता सर्रापणे प्रसारित केल्या जातात. ॲडल्ट हिंदी चित्रपटांना ए सर्टिफिकेट दिले जाते. परंतु दूरचित्रवाहिन्यांवरुन अशा प्रकारचे अश्लील कार्यक्रम आणि गाणी दाखविली जात असल्याने तरुण पिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता सर्व वाहिन्यांवरील अश्लील व हिंसात्मक कार्यक्रमांवर तत्काळ बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तत्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे."

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

" राज्यात एमपीएससीच्या वतीने सन 2012 मध्ये 359 पदासाठी राज्यसेवा परीक्षा घेण्यात आली होती. सदर मुख्य परीक्षेत पात्र ठरविण्यात आलेल्या 788 उमेदवारांना मुलाखतीस बोलाविण्यात आले होते, तथापि प्रश्नपत्रिकेत सुमारे 23 गुणांचे प्रश्न चुकले असल्याने काही तरुण न्यायालयात गेल्याने निकाल बदलण्याची शक्यता आहे. सदर चुकीच्या प्रश्नपत्रिकेमुळे परीक्षार्थी विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून चुकीच्या प्रश्नांचे मार्क ज्या परीक्षार्थींनी प्रश्न सोडविले आहेत. त्याना ते मार्क देऊन नोकरीची संधी देण्यात यावी, सदर चुकीच्या प्रश्नाव्दारे परीक्षार्थींचे नुकसान होवू नये याची दक्षता घ्यावी असे औचित्याच्या मुद्दयाव्दारे मी शासनाच्या निदर्शनास आणून आहे."

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

" मुंबई मुलुंड (पश्चिम) येथील आर.डी.भंडार चौक, स्टेशन रोडवरील कॅकडोनल्डसमोर श्री जयभवानी लॉटरी सेंटर, रेल्वे प्लॉटफॉर्म क्रमांक 1 च्या मागे, साई सागर व्हिडीओ सेंटर जवळील दुकान क्रमांक 1, एम.व्ही.पी.रोड जयसंतोषी माँ लॉटरी सेंटर, इंडियन बँकेसमोरील दुकान क्रमांक 1, महालक्ष्मी सेंटर, बोडके बिल्डिंग शॉप नंबर 11, समोरी जय संतोषी माँ लॉटरी सेंटर आणि गिरीराज हॉटेलसमोर कंद्र सरकारच्या लॉटरी रेग्युक्रेशन ॲक्ट 1998 व लॉटरी रेग्युलेशन रुल्स 2010 च्या तरतुदीचा भंग करुन झटपट लॉटरी मोठ्या प्रमाणात सुरु असल्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह शाळकरी मुले त्याकडे झटपट श्रीमंत होण्याच्यादृष्टीने आकृष्ट होऊन घरी चोरी करण्याच्या घटनात वाढ होणे, सदर लॉटरी धंदेवाले केंद्र सरकारच्या रेग्युलेशन ॲक्टचा भंग करीत असल्याने सदर धंदे तत्काळ बंद करावे असे या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे."

श्री.पद्माकर वळवी (क्रीडा व युवक कल्याण) : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

" मुंबई येथे असलेले कामा हॉस्पिटल हे स्त्रियाच्या उपचारासाठी असून सदर हॉस्पिटलमध्ये स्त्रियांवर नित्याने शस्त्रक्रिया केल्या जातात, शस्त्रक्रियेसाठी वापरण्यात येणारी शस्त्रे, स्त्रियाचे कपडे धुणे, आदिवासी मोठ्या प्रमाणात पाण्याची गरज असताना गत एक महिन्यापासून कामा हॉस्पिटलमध्ये अतिअल्प पाणीपुरवठा होत राहणे, परिणामी हॉस्पिटलमधील शेकडो शस्त्रक्रिया प्रलंबित राहिल्याचे तसेच हॉस्पिटलमध्ये दुर्गंधीचे वातावरण निर्माण झाल्याचे माहे जुलै, 2013 च्या तिसऱ्या सप्ताहात उघडकीसस येणे, याबाबत मुंबईतील कामा हॉस्पिटलमधीलपाण्याची निकड विचारात घेता सदर रुग्णालयात 24 तास पाणीपुरवठा करण्यात यावा असे या औचित्याच्या मुद्याव्दारे शासनाच्या निदर्शनास आणून देत आहे."

श्री.पद्माकर वळवी (क्रीडा व युवक कल्याण) : सभापती महोदय, नोंद घेण्यात आली आहे.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

" राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानांतर्गत राज्यात मोठ्या प्रमाणावर कंत्राटी पध्दतीवर अधिकारी व कर्मचारी नियुक्त करणेत आलेले असणे, सदर कर्मचाऱ्यांच्या सेवेमुळे ग्रामीण भागातील सार्वजनिक आरोग्य विभागाच्या कामास गतीयेवून ग्रामीण जनतेस आरोग्य सेवा सहजासहजी उपलब्ध होत असणे. या योजनेअंतर्गत कार्यरत असलेल्या काही पदांचे खाजगीकरण करण्यात आले असून नुकतचे सुमारे 2500 कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करणेत आलेले असणे, त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्ननिर्माण होवून त्यांच्यात असंतोष निर्माण झालेला असणे, या योजनेचे कामकाज गतीमान राहण्यासाठी शासनाने खाजगीकरणाऐवजी एनआरएचएममधील कंत्राटी पध्दत यापुढेही चालू ठेवावी,अशी मागणी या विशेष उल्लेखाच्या सूचनेव्दारे मी करीत आहे."

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेखाच्या सूचना</u>

पृ. शी./मु. शी. : राज्यात महिलांविरुध्द वाढत असलेल्या अत्याचारांना आळा घालण्याबाबत श्री.रमेश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

राज्यात महिलांविरुध्द वाढत असलेल्या अत्याचारांना आळा घालण्यासाठी कठोरातील कठोर कायदे करण्याचा शासनाने निर्णय घेण्यात येईल असे वक्तव्य करुनही नुकतेच माहितीच्या अधिकारात मागविलेल्या माहितीवरुन राज्यातील न्यायालयात 50 हजार खटले प्रलंबित असल्याचे उघडकीस येणे, खटले न्यायालयात प्रलंबित राहणे म्हणजे एक प्रकारे गुन्हेगारांना संरक्षण मिळणे, खटल्याची प्रक्रिया विलंबाने होत असल्याने गुन्हयात वाढ होण, याबाबत गुन्हे प्रवृत्तीला आळा घालणेबाबत राज्यातील खटल्याचा निकाल तातडीने लागणेबाबत कायद्यात तशी तरतूद करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : पोलीस कर्मचाऱ्यांची वर्षातून किमान एकदा शासनामार्फत वैद्यकीय तपासणी करण्याबाबत श्री.रमेश शेंडगे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

राज्यात नुकत्याच करण्यात आलेल्या सर्वेक्षणात गत दहा वर्षात 913 पोलिसांचा मृत्यू हा ऑन ड्युटी झाल्याचे उघडकीस येणे, त्यामध्ये मोठया प्रमाणात 40 ते 50 वयोगटातील पोलिसांची संख्या असून त्यातील बहुतांश पोलिसांचा मृत्यू हा कामाच्या वाढत्या ताणतणावामुळे झाल्याचे माहे जुलै, 2013 च्या चौथ्या सप्ताहात उघडकीस येणे, पोलिसांची प्रकृती चांगली रहावी व त्यांना सक्षमरित्या नोकरी करता यावी, याबाबत पोलिसांची किमान वर्षातून एकदा वैद्यकीय तपासणी शासनामार्फत करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : वरळी(मुंबई) येथील नरसी शिवाजी धर्मादाय अंध शाळेच्या वसतिगृहातील समस्या सोडविणे याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

मुंबई येथील वरळी येथे नरसी शिवाजी धर्मादाय अंध शाळेच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सन 1981 पासूनच्या खराब झालेल्या गाद्या, जूने पलंग, मळलेल्या जून्या चादरी तसेच विजेचा अपुरा पुरवठा अशा विविध समस्यांना सामना करीत अंध विद्यार्थी अनेक वर्षापासून रहात असल्याचे आढळून येणे, संस्थेचे विश्वस्त व संबंधित विभागाकडून याकडे दुर्लक्ष होणे, विद्यार्थ्यांनी संस्थेचे विश्वस्त व विभागाकडे समस्या सोडविण्याबाबत वारंवार मागणी करण्यात आल्याने संस्थेचे विश्वस्त व संबंधित विभागाने दिनांक 29 जून, 2013 रोजी बैठक घेऊन या अंध विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्याचे आश्वासन देण्यात येऊनही बैठक न घेणे किंवा समस्या सोडविण्याबाबतची कोणतीही उपाययोजना करण्यात न येणे, यामुळे अंध विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, यामुळे या अंध विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा पुरविण्याची नितांत आवश्यकता असल्याबाबत मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : ठाणे व कल्याण येथील धोकादायक व अनधिकृत इमारतीतील रहिवाशांसाठी सर्वसमावेशक धोरण राबविणे याबाबत श्री.संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

ठाणे व कल्याण मधील धोकादायक व अनधिकृत इमारतीतील रहिवाशांसाठी सर्वसमावेशक धोरण राबविण्याच्या दृष्टीने मुंबईच्या धर्तीवर ठाणे व कल्याणसाठी सुध्दा दुरुस्ती व पुनर्विकास मंडळ गठीत करण्याची आवश्यकता आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर जारी केलेल्या सन 1999 च्या अधिसूचनेन्वये केवळ सन 1974 पूर्वीच्याच धोकादायक इमारतींना वाढीव एफएसआय देता येत होता. परंतु सर्वेक्षण केले असता असे आढळून आले की, साधारणत: 30 वर्षे पूर्ण झालेल्या इमारतीसाठी दुरुस्ती अथवा पुनर्विकास करण्याची गरज भासते. ठाणे व कल्याण भागातील धोकादायक इमारतींची संख्या पाहता तेथे दुरुस्ती व पुनर्विकास मंडळ तयार व्हावे याकडे मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : सामुदायिक शेती प्रकल्पास प्राधान्य देणे
याबाबत श्री.संजय दत्त, वि. प. स. यांनी
दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

मागील दोन वर्षापासून राज्यातील अन्नधान्याचे उत्पादन 18 टक्क्यांनी घटलेले आहे. वाढती लोकसंख्या, विभक्त कुटुंब पध्दती यामुळे शेतकऱ्यांच्या व्यक्तिगत वाट्याला खूप कमी जमीन येते, वाढीव उत्पन्नाच्या आशेने खेड्याकडून तरुणवर्ग शहराकडे वाटचाल करीत आहे. कमी जमिनीसाठी तुलनात्मकदृष्टया जास्त प्रमाणात उत्पादन खर्च लागतो. उत्कृष्ट तंत्रज्ञानाचा वापर करता येत नाही, शेतमालाला चांगला भाव मिळत नाही,

नंतर वाय.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त....

सामुदायिक शेतीमुळे उत्पादन खर्च, वाहतूक खर्च कमी लागू शकतो. रिटेल मार्केटींगच्या माध्यमातून शेतमालाला चांगला दर मिळू शकतो, बँकेच्या सुविधा उपलब्ध होतात. योग्य प्रकारे सिंचन योजना राबविता येतात, अन्न प्रक्रिया प्रकल्पांसाठी संधीची उपलब्धता मिळते, असे विविध फायदे "सामुदायिक शेती" प्रकल्पात असल्याने शासनाकडून छोटया शेतकऱ्यांना एकत्रित करुन अशा प्रकल्पांसाठी उद्युक्त करण्यासाठी काही आकर्षक योजना बनवणे व त्याच्या अंमलबजावणीसाठी प्रयत्न करणे,ही काळाची गरज आहे. यासाठी मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. :जि.नाशिक,ता.चांदवड,मौजे कातरवाडी ते अनकाईबारी हा वहिवाटीचा रस्ता बंद करणे याबाबत श्री.चरण सिंग सप्रा, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. चरण सिंग सप्रा (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"जि.नाशिक, ता.चांदवडमधील मौजे कातरवाडी ते अनकाईबारी हा रस्ता 100 वर्षापासून वहिवाटीचा आहे. शासनाने गेल्या 25 वर्षापूर्वी या रस्त्याचे खडीकरण केले आहे. तसेच सन 2011 मध्ये या रस्त्याचे डांबरीकरणही केले आहे. मौजे कातरवाडी येथील रहिवासी व सार्वजनिक बांधकम खात्याचा कार्यकारी अभियंता श्री. रावसाहेब झाल्टे यांनी हा रस्ता बंद करण्यासाठी शेजारी असलेले 30 वर्षापूर्वीचे शासन निर्मित गावतळे/पाझर तलाव फोडून, खोदून त्याची जवळ जवळ 25 ते 30 हजार ट्रक माती, मुरुम या रस्त्यावर टाकून सपाटीकरण करुन सप्टेंबर, 2012 दरम्यान रस्ता बंद करुन, मोठे प्रवेशद्वार लावून ग्रामस्थ व इतर लोकांसाठी रस्ता बंद केलेला आहे. यामुळे वडगांव, रापली,वागदर्डी, भडाणे, रायपुर इत्यादी 15 गावे वाहतुकीस मुकली आहे. मा. तहसीलदार, चांदवड यांनी रु. 60,75,000/-ची नोटीस बजावून देखील आजतागायत त्याची वसूली झालेली नाही. सदर अधिकारी चांदवड, नाशिक विभागात अधिकतर कार्यालयात होता. त्याचे वैयक्तिक हितसंबध जपल्यामुळे संबंधित यंत्रणेकडून 30 वर्षापूर्वीचे रेकॉर्ड उपलब्ध नसल्याचे सांगण्यात येते. सदर अधिकाऱ्याच्या धरातील सदस्यांनी ग्रामपंचायत सदस्य, मार्केट कमिटी, माजी पोलीस पाटील, माजी सरपंच अशी राजकीय पदे सांभाळलेली असल्यामुळे त्यांची या भागात दहशत आहे. संबंधित प्रकरणाचा शासनाने निरपेक्षभावनेने तपासणी करुन योग्य ती कार्यवाही करावी अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु.शी.: चालू शैक्षणिक वर्षामध्ये अंशकालीन शिक्षकांना पुनर्नियुक्ती देण्यात न येणे याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिनियम 2009 नुसार राज्यातील जिल्हापरिषद, महापालिका व नगरपालिकांच्या शाळांमध्ये मागील वर्षी कला, क्रीडा व कार्यानुभवाच्या अंशकालीन शिक्षकांची नियुक्ती केलेली असणे, मात्र चालू शैक्षणिक वर्षामध्ये या अंशकालीन शिक्षकांना पुनर्नियुक्ती देण्यात न येणे, मागील वर्षी या शिक्षकांमुळे विद्यार्थ्यांच्या कला व क्रीडा गुणांना वाव मिळून त्यांच्या एकूण गुणवत्तमध्ये सकारात्मक बदल झाल्याचे दिसून येणे, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी सदर शिक्षकांची आवश्यकता असणे, केंद्र शासनाला सादर केलेल्या चालू वर्षाच्या कार्यक्रम अंमलबजावणी आराखडयामध्ये सदर अंशकालीन निर्देशांकाच्या पदांसाठी राज्य शासनाने तरतुदीची मागणीच केलेली नसणे, शिक्षक हक्क कायद्यानुसार सुध्दा कला, क्रीडा व कार्यनुभव शिक्षकांची नियुक्ती करणे बंधनकारक असणे, मा. उच्च न्यायालयायाच्या निर्देशानुसार सदर पदावरील नियुक्तीबाबत धोरण ठरवून कला, क्रीडा व कार्यानुभव विषयाच्या अंशकालीन निदेशकांना तातडीने पुनर्नियुक्ती देण्यात यावी, अशी मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : राज्यातील 29 पैकी तब्बल 28 प्रकल्प कार्यालयांना गेल्या 18 वर्षापासून आयएएस दर्जाचा अधिकारी नसणे याबाबत श्री.जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"आदिवासी विकास विभागाच्या कोटयावधी रुपयांच्या योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या राज्यातील 29 पैकी तब्बल 28 प्रकल्प कार्यालयांना गेल्या 18 वर्षापासून आयएएस दर्जाच्या अधिकाऱ्यांची प्रतीक्षा असणे, संवेदनशील असलेल्या अकरापैकी आठ प्रकल्पांचा कारभार प्रभारी आयएएस अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आलेला असणे, विशेष म्हणजे उच्च न्यायालयाच्या आदेशानंतरही राज्य सरकार आयएएस अधिकाऱ्याच्या नियुक्तीकडे दुर्लक्ष करीत असणे, आदिवासींच्या योजनांची अंमलबजावणी करण्याची मुख्य जबाबदारी ही प्रकल्प अधिकारी कार्यालयाची असते. मंत्रालयातून आणि आयुक्तालयातून येणाऱ्या योजना आदिवासीपर्यंत पोहचविण्याचे काम ही प्रकल्प कार्यालये करतात. राज्यात सध्या अशी 29 आदिवासी प्रकल्प कार्यालये आहेत. आदिवासी जनतेच्या योजनांची नियोजनबध्द अंमलबजावणी करण्यासाठी शासनाने मा. न्यायालयाच्या आदेशाचा मान राखून राज्यातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांमध्ये पूर्णवेळ आयएएस अधिकाऱ्याची तातडीने नेमणूक करावी अशी मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

यानंतर श्री. भारवि....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : सौ.नलिनी सुरेश कुळकर्णी, शिक्षिका यांना प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी व अन्य लाभ देणे याबाबत श्री.निरंजन डावखरे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सौ.नलिनी सुरेश कुळकर्णी या शिक्षिका म्हणून एल.के.हायस्कूल, चुनाभट्टी, मुंबई या शाळेतून दिनांक 28 फेब्रुवारी 2006 रोजी सेवानिवृत्त झालेल्या आहेत. सौ.कुळकर्णी यांच्या मूळ नियुक्ती पत्रानुसार दिनांक 1 जुलै 1992 ते सेवानिवृत्ती पर्यंत प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी मिळण्यास त्या पात्र असूनही त्यांच्या अपदवीधर श्रेणीचे वेतन देण्यात येणे, या प्रकरणी सौ.नलिनी कुळकर्णी यांनी मा.उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असताना दिनांक 14 जून 2012 रोजी न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकाल देणे, सौ.नलिनी सुरेश कुळकर्णी या सेवानिवृत्त होऊन 7 वर्षाचा कालावधी होऊनही तसेच, मा.उच्च न्यायालयाने त्यांच्या बाजूने निकाल दिलेला असतानाही त्यांना अद्यापही अनुज्ञेय निवृत्ती वेतन, अंशराशी उपदान (ग्रॅच्युईटी) व इतर लाभ अदा करण्यात आलेले नाहीत. तरी सौ.कुळकर्णी यांना प्रशिक्षित पदवीधर वेतनश्रेणी व अन्य लाभ देण्यात यावेत अशी मागणी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून मी शासनाला करीत आहे.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : राज्यातील सहकारी गृहनिर्माण नियंत्रणासाठी स्वतंत्र कायदा व स्वतंत्र प्रशासकीय विभाग निर्माण करणे याबाबत श्री.निरजंन डावखरे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सहकारी संस्था अधिनियम 1960 व नियमावली 1961 या अंतर्गत राज्यातील सर्व प्रमुख शहरांमध्ये लाखो सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापित झालेल्या आहेत असणे, कमी किंमतीत घरे उपलब्ध करुन देण्यासाठी गृहनिर्माण सहकारी संस्था व सदनिकाधारक यांना प्रचलित अधिनियम व नियमावलीतून वगळून त्याऐवजी शासनाच्या नगरविकास विभाग व गृहनिर्माण विभाग यांच्या धर्तीवर एक स्वतंत्र विभाग व स्वतंत्र अधिनियम तयार करण्यात यावा, अशी मागणी सहकारी गृहनिर्माण संस्था संघटना यांचेकडून दिनांक 29 एप्रिल, 2013 रोजी वा त्या सुमारास प्रधान सचिव, सहकार विभाग यांचेकडे करण्यात आली असणे, मागणीनुसार शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत असणे, अशी मागणी मी विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांच्या मागण्या मान्य करणे याबाबत श्री.नरेंद्र पाटील वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.नरेंद्र पाटील (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

महाराष्ट्र राज्यात खेडोपाडी व दुर्गम भागामध्ये रात्री-अपरात्री संकटकालीन रूग्णांसाठी देवासमान असलेले होमिओपॅथी डॉक्टर्स उपलब्ध असून हृदयविकार, साथीचे आजार, बाळंतपण, विंचूदंश, सर्पदंश व इतर अपघात अशा अनेक आजारांमध्ये हे डॉक्टर रूग्णहितासाठी काम करीत असतात. परंतु, बऱ्याचवेळा कर्तव्य बजावत असताना होमिओपॅथी डॉक्टरांना कायद्यातील काही जाचक तरतुदीमुळे अनेक कायदेशीर समस्यांना सामोरे जावे लागत असणे व त्यामुळे अनेक होमिओपॅथी डॉक्टर्स अडचणीमध्ये असून या विषयी लवकरात लवकर तोडगा न निघाल्यास हे डॉक्टर्स वैद्यकीय व्यवसायापासून वंचित होण्याची शक्यता व तसे झाल्यास ग्रामीण भागातील नागरिकांना होमिओपॅथी डॉक्टरांच्या उपचारापासून दूरावल्यास त्यांची गैरसोय होण्याची शक्यता, याबाबत राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांच्या मागण्या मान्य करून त्यांना त्याचा व्यवसाय करण्यास परवानगी देण्यात यावी अशी शिफारस या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनास करीत आहे.

.....

...4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवणे याबाबत श्रीमती विद्या चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडते.

प्रत्येक वस्तूच्या उत्पादन खर्चावर आधारित वस्तूची किंमत ठरविली जाते. त्याचे बंधन असणे आवश्यक आहे. परंतु, मुंबईसह राज्यात सदनिकांच्या किंमती प्रचंड प्रमाणात वाढणे, सदरहू सदनिकांच्या किंमती मूळ किंमतीपेक्षा किती तरी पट अधिक असल्याने, सर्वसामान्य ग्राहक आणि जनतेस सदनिका खरेद करणे आवाक्याबाहेर जाणे, सर्वसामान्य जनतेला मोठे घर घेण्याची ऐपत नसल्यामुळे त्यांच्यासाठी लहान घरे बांधण्याची विकासकांवर सक्ती करण्याची आवश्यकता, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित करून स्थिर ठेवण्याची राज्यातील जनतेकंडून होत असलेली मागणी, सदनिकांचे वाढते दर नियंत्रित ठेवण्यासाठी खाजगी बांधकाम व्यावसायिकांनी खरेदी केलेली जमीन आणि बांधकामाचा खर्च गृहीत धरून एरियावाईज प्रतिचौरस फूट या प्रमाणे शासनाने घरांच्या किंमती जाहीर करून व वाढते दर नियंत्रित करून सर्वसामान्य जनतेला परवडतील अशा किंमतीत घर देण्याबाबत राज्य शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी अशी शिफारस मी विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

.....

यानंतर श्री.अजित....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर होणारे अपघात रोखण्यासाठी करावयाची उपाययोजना या बाबत श्री.अनिल भोसले, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.अनिल भोसले (पुणे स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर गेल्या सात वर्षात 3 हजार 464 अपघात झाल्याचे माहे मे 2013 च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले आहे. पुणे-मुंबई महामार्गावर समांतर रस्त्यांवर वाढलेले अनधिकृत थांबे, गॅरेज, रस्त्यांवरच उभ्या असलेल्या वाळूच्या गाड्या, अवजड वाहनांचे अतिक्रमण होत असल्याचे माहे मे 2013 च्या दरम्यान निदर्शनास आले आहे. महामार्गावर जड वाहनांना थांबण्यास मनाई असताना त्याकडे वाहनचालकांचे व वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष होत आहे. परिणामी त्या ठिकाणी अपघातांचे प्रमाण वाढल्याने त्यात अनेकांचा मृत्यू झाल्याचे आढळून आले आहे. हे अपघात रोखण्यासाठी व अनधिकृत पार्कींग होऊ नये म्हणून आवश्यक ती उपाय योजना करावी अशी विनंती मी या विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे शासनास करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : गव्हाणपाडा, मुलुंड येथील पाम एकर सोसायटीच्या बाहेर सुरु असलेला अनधिकृत मासळी बाजार बंद करणे या बाबत श्री. रमेश शेंडगे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

मुलुंड (पूर्व) गव्हाणपाडा येथे अधिकृत मासळी विक्री बाजार सुरु असताना मुलुंड (पूर्व) येथील पाम एकर हाऊसिंग सोसायटीच्या बाहेर अनधिकृत मासळी बाजार सुरु आहे. सदर बेकायदेशीर मासळी बाजारावर कारवाई करुन तो बंद केल्याचे महानगरपालिका आयुक्तांकडून कळविण्यात आले. परंतु आजही तो अनधिकृत मासळी बाजार सुरु आहे. हा मासळी बाजार सुरु असल्यामुळे त्या परिसरात दुर्गंधी झालेली आहे. तेथे रोगरोईचे प्रमाण वाढलेले आहे. मुंबई महानगरपालिका क्षेत्रात डेंग्यू आणि मलेरिया रुग्णात वाढ होत आहे. अशाप्रकारे बेकायदेशीररित्या सुरु असलेल्या मासळी बाजारावर त्वरित कारवाई करुन हा बाजार बंद करावा व तेथील लोकांचे धोक्यात आलेले आरोग्य व इतर गोष्टींना पायबंद घालण्याच्या दृष्टीने शासनाने मदत करावी अशी विनंती मी विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नक्षलग्रस्त राज्यांना पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्राकडून मिळणारा निधी खर्च न करणे याबाबत ॲड.जयदेवराव गायकवाड, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.जयदेवराव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

छत्तीसगडमधील नक्षलवादी हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर केंद्राने अंतर्गत सुरक्षेबाबत घेतलेल्या बैठकीत महाराष्ट्रासह अन्य नक्षलग्रस्त राज्यांना पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्राकडून मिळणारा 65 कोटी रुपयांचा निधी वापराविना पडून असल्याचे नुकतेच उघडकीस येणे, तसेच नक्षलवाद्यांच्या भीषण हल्ल्यात छत्तीसगडमधील प्रमुख काँग्रेस नेत्यांची हत्या झाल्याने राज्यातील पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी केंद्र शासनाकडून तातडीने दखल घेण्यात येऊन एम.पी.एफ. योजनेंतर्गत दरवर्षी कोट्यावधीचा निधी देत असणे, अत्याधुनिक शस्त्रे व हत्यारे, पोलीस प्रशिक्षणाच्या सुविधा दुर्गम भागात पायाभूत सुविधांचे जाळे उभारणे, आदि कामांसाठी हा निधी देण्यात येत असणे. मात्र केंद्राकडून आलेला निधी अत्यल्प वापरण्यात किंवा खर्च करण्यात न येणे, परिणामी नक्षलग्रस्त भागात देशाच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील पोलीस आणि नागरिकांचे मृत्यू जास्त होत असल्याचे उघडकीस येणे, नक्षलग्रस्त भागात पोलीस व नागरिकांचे मृत्यू होऊ नयेत म्हणून पोलीस खात्याचे आधुनिकीकरण करणेबाबत केंद्र शासनाकडून आलेल्या निधीचा पूर्ण वापर करण्यात यावा अशी मागणी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाकडे करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी.: नाशिक जिल्ह्यातील पळसे येथील नाशिक सहकारी साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीत झालेला अपहार या बाबत श्री.जयवंतराव जाधव, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

नाशिक जिल्यातील पळसे येथील नाशिक सहकारी साखर कारखाना लि. या कारखान्याच्या कर्मचाऱ्यांच्या 48 लाखांच्या भविष्य निर्वाह निधीचा अपहार केल्या प्रकरणी नाशिक साखर कारखाना कामगार युनियनच्या तक्रारीनंतर भविष्य निर्वाह निधी निरीक्षकाने संचालक मंडळाविरुध्द दिनांक 10 एप्रिल, 2013 रोजी वा त्यासुमारास गुन्हा दाखल केल्याचे निदर्शनास येणे, कारखान्यातील गैरव्यवहारांसंबंधी चौकशी करण्यासाठी प्रादेशिक सहसंचालक (साखर) अहमदनगर यांनी नियुक्त केलेले चौकशी अधिकारी द्वितीय लेखापरीक्षक, सहकारी संस्था (साखर) नाशिक यांनी माहे मे 2013 मध्ये वा त्या दरम्यान चौकशी अहवाल सादर केलेला नसल्याचे निदर्शनास येणे, सदर कारखान्याचे लेखा परिक्षण ज्यांनी केले त्यांचीच चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केल्यामुळे सदर चौकशी नि:पक्षपातीपणे होण्यासाठी आयुक्त दर्जाच्या अधिकाऱ्यांची चौकशीसाठी नेमणूक करून गैरव्यवहारांची व अवाजवी खर्चाची रक्कम वसूल करावी अशी मागणी मी या विशेष उल्ले्खाद्वारे शासनास करीत आहे.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकत झालेला भ्रष्टाचार याबाबत श्री. जयवंतराव जाधव वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. जयवंतराव जाधव (नाशिक स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

"नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने रेणुका देवी यंत्रमाग औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, मालेगाव या संस्थेस दिनांक 5 जानेवारी, 2013 ते दिनांक 16 मे, 2013 या कालावधीत अचानक ठराव घेऊन सहकारी संस्था कायद्याचे उल्लंघन करुन देय मर्यादेपेक्षा जास्त बेकायदेशीर कर्ज मंजूर करुन बँकेची आर्थिक लूट करणे, तसेच सदर बँकने दिनांक 26 डिसेंबर, 2012 च्या मासिक सभेतील निर्णयानुसार शाखा नूतनीकरण, फर्निचर्स खरेदी व अंतर्गत दुरुस्ती तसेच कॅलेंडर व डायऱ्यांची छपाई ही कामे सुध्दा कोटेशनच्या माध्यमातून केल्याचे दिसून येणे, या उक्त प्रकरणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक 7 मे, 2013 रोजी वा त्या सुमारास शासनाकडे तक्रारी करणे, या सर्व गोष्टी करुन सुध्दा सदरहू संस्थेवर शासनामार्फत कोणतीही कारवाई न झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे सदरहू संस्थेवर कायदेशीर कारवाई करुन त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे."

तालिका सभापती (श्री. किरण पावसकर) : आज औचित्याचे मुद्दे आणि विशेष उल्लेख भरपूर झालेले आहेत. आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत दाखविण्यात आलेले अशासकीय कामकाज पुढे ढकलण्यात येत आहे.

सभा□ृहाची बैठ□ आता स्थ□ित होऊ□ सोमवार, दिनांक 29 जुलै, 2013 रोजी सकाळी 11.00 वाजता पु□ भरेल.

(सभा□ृहाची बैठ□ दुपारी 3 वाजू□ 01 मि□िटाने, सोमवार, दि□ी□ 29 जुलै, 2013 च्या स□ाळी वाजेपर्य□त स्थ□ित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेखाच्या सूचना</u>

पृ. शी./मु. शी. : राज्यात महिलांविरुध्द वाढत असलेल्या अत्याचारांना आळा घालण्याबाबत श्री.रमेश शेंडगे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

राज्यात महिलांविरुध्द वाढत असलेल्या अत्याचारांना आळा घालण्यासाठी कठोरातील कठोर कायदे करण्याचा शासनाने निर्णय घेण्यात येईल असे वक्तव्य करुनही नुकतेच माहितीच्या अधिकारात मागविलेल्या माहितीवरुन राज्यातील न्यायालयात 50 हजार खटले प्रलंबित असल्याचे उघडकीस येणे, खटले न्यायालयात प्रलंबित राहणे म्हणजे एक प्रकारे गुन्हेगारांना संरक्षण मिळणे, खटल्याची प्रक्रिया विलंबाने होत असल्याने गुन्हयात वाढ होण, याबाबत गुन्हे प्रवृत्तीला आळा घालणेबाबत राज्यातील खटल्याचा निकाल तातडीने लागणेबाबत कायद्यात तशी तरतूद करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : पोलीस कर्मचाऱ्यांची वर्षातून किमान एकदा शासनामार्फत वैद्यकीय तपासणी करण्याबाबत श्री.रमेश शेंडगे,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

राज्यात नुकत्याच करण्यात आलेल्या सर्वेक्षणात गत दहा वर्षात 913 पोलिसांचा मृत्यू हा ऑन ड्युटी झाल्याचे उघडकीस येणे, त्यामध्ये मोठया प्रमाणात 40 ते 50 वयोगटातील पोलिसांची संख्या असून त्यातील बहुतांश पोलिसांचा मृत्यू हा कामाच्या वाढत्या ताणतणावामुळे झाल्याचे माहे जुलै, 2013 च्या चौथ्या सप्ताहात उघडकीस येणे, पोलिसांची प्रकृती चांगली रहावी व त्यांना सक्षमरित्या नोकरी करता यावी, याबाबत पोलिसांची किमान वर्षातून एकदा वैद्यकीय तपासणी शासनामार्फत करण्यात यावी, अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : वरळी(मुंबई) येथील नरसी शिवाजी धर्मादाय अंध शाळेच्या वसतिगृहातील समस्या सोडविणे याबाबत श्री.सुभाष चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

मुंबई येथील वरळी येथे नरसी शिवाजी धर्मादाय अंध शाळेच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना सन 1981 पासूनच्या खराब झालेल्या गाद्या, जूने पलंग, मळलेल्या जून्या चादरी तसेच विजेचा अपुरा पुरवठा अशा विविध समस्यांना सामना करीत अंध विद्यार्थी अनेक वर्षापासून रहात असल्याचे आढळून येणे, संस्थेचे विश्वस्त व संबंधित विभागाकडून याकडे दुर्लक्ष होणे, विद्यार्थ्यांनी संस्थेचे विश्वस्त व विभागाकडे समस्या सोडविण्याबाबत वारंवार मागणी करण्यात आल्याने संस्थेचे विश्वस्त व संबंधित विभागाने दिनांक 29 जून, 2013 रोजी बैठक घेऊन या अंध विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्याचे आश्वासन देण्यात येऊनही बैठक न घेणे किंवा समस्या सोडविण्याबाबतची कोणतीही उपाययोजना करण्यात न येणे, यामुळे अंध विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होत असलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना, यामुळे या अंध विद्यार्थ्यांना मूलभूत सुविधा पुरविण्याची नितांत आवश्यकता असल्याबाबत मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : ठाणे व कल्याण येथील धोकादायक व अनधिकृत इमारतीतील रहिवाशांसाठी सर्वसमावेशक धोरण राबविणे याबाबत श्री.संजय दत्त, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

ठाणे व कल्याण मधील धोकादायक व अनधिकृत इमारतीतील रहिवाशांसाठी सर्वसमावेशक धोरण राबविण्याच्या दृष्टीने मुंबईच्या धर्तीवर ठाणे व कल्याणसाठी सुध्दा दुरुस्ती व पुनर्विकास मंडळ गठीत करण्याची आवश्यकता आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाच्या पार्श्वभूमीवर जारी केलेल्या सन 1999 च्या अधिसूचनेन्वये केवळ सन 1974 पूर्वीच्याच धोकादायक इमारतींना वाढीव एफएसआय देता येत होता. परंतु सर्वेक्षण केले असता असे आढळून आले की, साधारणत: 30 वर्षे पूर्ण झालेल्या इमारतीसाठी दुरुस्ती अथवा पुनर्विकास करण्याची गरज भासते. ठाणे व कल्याण भागातील धोकादायक इमारतींची संख्या पाहता तेथे दुरुस्ती व पुनर्विकास मंडळ तयार व्हावे याकडे मी विशेष उल्लेखाच्या सूचनेद्वारे सभागृहाचे लक्ष वेधू इच्छितो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी./मु. शी. : सामुदायिक शेती प्रकल्पास प्राधान्य देणे
याबाबत श्री.संजय दत्त, वि. प. स. यांनी
दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

मागील दोन वर्षापासून राज्यातील अन्नधान्याचे उत्पादन 18 टक्क्यांनी घटलेले आहे. वाढती लोकसंख्या, विभक्त कुटुंब पध्दती यामुळे शेतकऱ्यांच्या व्यक्तिगत वाट्याला खूप कमी जमीन येते, वाढीव उत्पन्नाच्या आशेने खेड्याकडून तरुणवर्ग शहराकडे वाटचाल करीत आहे. कमी जमिनीसाठी तुलनात्मकदृष्टया जास्त प्रमाणात उत्पादन खर्च लागतो. उत्कृष्ट तंत्रज्ञानाचा वापर करता येत नाही, शेतमालाला चांगला भाव मिळत नाही,

नंतर 2जी.1..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही